

दैनिक

# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ०२ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


जीवनाच्या वाटेवर, पुन्हा मागे वळून पाहू.
सोडून गेल्या क्षणांना, आठवणींत जपून ठेऊ.
उरले सुरले क्षण जेवढे, आनंदाने जगत जाऊ.
रंगात रंगून होळीच्या, हर्ष उधळत राहू




होळीच्या हार्दिक शुभेच्छा...!

## उद्या अंक नाही

आज सोमवार, दि. ०२ मार्च २०२६ रोजी **होळी निमित्त** **दै. संध्या** कार्यालयाला सुट्टी असल्याने मंगळवार, दि. ०३ मार्च २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

*-संपादिका*

## ढिंग-टांग




# कंपनीत स्फोट



**१७ ठार, १८ जखमी; दारुगोळा तयार करताना घडली घटना, मुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश**

**नागपूर (दै. संध्या)**

नागपूरच्या कळमेश्वर तालुक्यातील राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड (पूर्वीची स्पेशल ब्लास्ट लिमिटेड) या दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीत आज सकाळी भयंकर स्फोट झाला आहे. त्यात 17 कामगार ठार झाले असून, अनेकजण जखमी झाले आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, राऊळगाव लगतच्या येनवरा गावात एसबीएल एनर्जीचा प्रकल्प आहे. या ठिकाणी डेटोनेटर्स, स्लरी एक्सप्लोजिव्ह, कास्ट बूस्टर्स, सिजमिक एक्सप्लोसिव्हसचे उत्पादन होते. त्यातीलच एका युनिटमध्ये आज सकाळी 7 च्या सुमारास अचानक स्फोट झाला. त्यात 17 जण ठार झालेत. नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी याची पुष्टी केली आहे. जखमींची नेमकी माहिती हाती यायची आहे. ही घटना घडली तेव्हा एसबीएलच्या विविध युनिटमध्ये 30 हून अधिक कर्मचारी काम करत होते. त्यामुळे मृत्त व जखमींचा आकडाही वाढण्याची शक्यता आहे.

## अमित शाह यांचे मुंबईत आगमन



**मुंबई (दै. संध्या)**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ येथे दुपारी १.३५ वाजता आगमन झाले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, महापौर रितू तावडे, आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, प्रवीण दरेकर, अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर आदी उपस्थित होते.

## परभणी जिल्ह्यातील कोल्हावाडीत पहिली 'बर्तन बँक'

**परभणी (दै. संध्या)**

जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील कोल्हावाडी ग्रामपंचायतीने त्रिमूर्ती उत्पादक महिला बचत गटाच्या पुढाकारातून जिल्ह्यातील पहिली 'बर्तन बँक' सुरू केली. त्या माध्यमातून धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांत प्लास्टिकला पूर्णविराम देत स्टीलच्या भांड्यांचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. 1 मार्च रोजी या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. भागवत सप्ताह असो किंवा इतर कोणतेही धार्मिक, सामाजिक कार्यक्रम असोत, गावात आता स्टीलच्या ताट-वाट्या आणि ग्लासचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. यामुळे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंना पूर्णविराम मिळणार आहे. 'माझी वसुंधरा' अभियानात मराठवाडा विभागात अव्वल क्रमांक पटकावलेल्या कोल्हावाडी ग्रामपंचायतीने पर्यावरण संवर्धनाची भूमिका अधिक बळकट करण्याचा निर्धार केला आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.



■ प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने आदर्श पाऊल

# युद्धजन्य परिस्थितीमुळे 'उमरा' यात्रेकरू संकटात

**महाराष्ट्रातील ५० हजार मुस्लीम भाविक सौदीत अडकल्याची भीती, प्रशासकीय स्तरावर हालचाली सुरू**

**मुंबई (दै. संध्या)**

रमजानच्या पवित्र महिन्यात 'उमरा' या धार्मिक विधीसाठी सौदी अरेबियात गेलेल्या महाराष्ट्रातील सुमारे ५० हजार ते १ लाख मुस्लिम बांधवांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आखाती देशांमधील बिघडलेली युद्धजन्य परिस्थिती पाहता, हे भाविक तेथे अडकल्याची दाट शक्यता राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने तातडीने हालचाली सुरू केल्या असून, सर्व यात्रेकरूंना सुरक्षित परत आणण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.



हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची सरकारकडे अधिकृत नोंद असते, मात्र उमरासाठी अशी कोणतीही केंद्रीकृत व्यवस्था नाही. बहुतांश यात्रेकरू खासगी टूर अँड ट्रॅव्हल्स ऑपरेटर्समार्फत प्रवास करतात. "राज्यातील सुमारे ५०० हून अधिक ऑपरेटर्सनी यंदा यात्रेकरूंना पाठवले असून, त्यापैकी केवळ मुंबईतूनच १०० हून अधिक ऑपरेटर्स सक्रिय आहेत. त्यामुळे अडकलेल्या भाविकांचा नेमका आकडा सोमवारपर्यंत स्पष्ट होईल," असे प्यारे खान यांनी सांगितले. उमरासाठी गेलेल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांतील भाविकांचा समावेश आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे विमानांची उड्डाणे रद्द झाल्यास किंवा मुक्काम लांबल्यास या यात्रेकरूंना मोठ्या आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागू शकते. ही बाब लक्षात घेऊन भारतीय दूतावासाशी समन्वय साधला जात असून, भाविकांना तिथे कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्य अल्पसंख्यांक आयोग या संपूर्ण प्रकरणावर बारीक लक्ष ठेवून आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून केंद्र सरकारमार्फत विशेष मदत मिळवण्याची विनंती केली जाणार आहे, असेही प्यारे खान यांनी सांगितले. राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि गावातून भाविक उमरासाठी जात असल्याने, ही घटना राज्यभरातील हजारो कुटुंबांच्या काळजाचा ठोका चुकवणारी ठरत आहे.

## ब्रेकिंग न्यूज

### एम.पी.आय.डी गुन्ह्यातील आरोपीला जामीन मंजूर

पुणे (दै. संध्या) : ऑक्टोबर २०२१ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत आरोपींनी ड्रॉनक्स कंपनीत दरमहा ८ ते १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी गजानन जयप्रकाश काळे व ३९ गुंतवणूकदारांकडून सुमारे ५.१९ कोटी १६ हजार ७६५ रुपयांची फसवणूक केली. आरोपींनी dronx . biz ही बनावट वेबसाइट तयार करून खोटे दस्तऐवज व रिटर्न दाखविले, सेमिनार व झूम मीटिंगद्वारे गुंतवणूकदारांना फसविले असल्याने वाकड पोलीस ठाण्यात भा.द.वी कलम ४२०,४०६,४६७,४६८,४७१,१२०(ब), आयटी ॲक्ट कलम ६६(डी) व एमपीआयडी ॲक्ट कलम ३,४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच गुन्ह्याच्या तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपी क्रिश रेड्डी रा. हैदराबाद याने इतर आरोपींशी संगनमत करून पूर्वनियोजित कट रचून ड्रोनएक्स कंपनीद्वारे हॉटेलांमधील सेमिनार, गुंतवणूकदारांशी प्रत्यक्ष भेटी, ईमेल आणि झूम मिटिंग्स आयोजित करून गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. ड्रॉन कॉइनच्या सिल्व्हर, सुपर, गोल्ड, प्लॅटिनम योजनांत गुंतवणूक केल्यास दरमहा ८-१०% परतावा देण्याचे प्रलोभन देऊन त्यांना गुंतवणुकीस भाग पाडले. यासाठी स्वतःला ड्रोनएक्सचे फाउंडर व बॉस असल्याचे सांगितले होते तसेच आरोपी क्रिश रेड्डीला दि. २५ मे २०२५ रोजी अटक करण्यात आली होती. तसेच ॲड. राजेश चंदू वाघमारे यांच्या मार्फत आरोपी नामे क्रिश रेड्डी याने विशेष जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथे जामीन अर्ज दाखल केला होता.

# अजित पवारांचा अपघात नव्हे १००% घातपात

■ विजय वडेट्टीवार यांचा दावा; AAIB च्या अहवालावर उपस्थित केले गंभीर प्रश्नचिन्ह

**मुंबई (दै. संध्या)**

काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी अजित पवार यांचा अपघात नव्हे तर 100 टक्के घातपात असल्याचा दावा केला आहे. त्यांनी या प्रकरणी अजित पवारांच्या विमान अपघाताविषयी एएआयबीने सादर केलेल्या अहवालावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एएआयबी अजित पवारांचे विमान झाडाला धडकून खाली कोसळले अशी तकलादू थेअरी देत असेल, तर त्यामुळे अजितदादांचा घातपात झाला हे स्पष्ट होते, असे ते म्हणालेत. अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी बारामती येथील एका विमान अपघातात निधन झाले. त्यानंतर काल या घटनेला 1 महिना पूर्ण झाल्यानंतर एएआयबीने (विमान अपघात तपास ब्यूरो) या घटनेशी संबंधित आपला प्राथमिक अहवाल जाहीर केला. या अहवालात अजित पवारांचे विमान प्रथम झाडाला धडकले आणि त्यानंतर खाली कोसळले असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त दावा केला आहे. विजय वडेट्टीवार एएआयबीच्या अहवालावर बोलताना म्हणाले, एएआयबीच्या अहवालात विमान एका झाडाला धडकले आणि खाली कोसळल्याचे नमूद करण्यात आले आहे.



ते अशी तकलादू थेअरी देत असतील तर त्यातून स्पष्ट होते की, अजितदादांचा अपघात नाही, तर घातपात आहे. तब्बल एका महिन्याने असा अहवाल आला. त्यात अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. माझ्या मते हा अहवाल पूर्णतः मॅनेज आहे. हा ठरवून दिलेला अहवाल आहे. हा 100 टक्के अपघात नाही. हा अजितदादांचा घातपातच आहे. सगळ्या गोष्टी कॅमेऱ्यामध्ये कैद झाल्या आहेत. ते विमान हवेतच उलटल्याचे दिसत आहे. त्यानंतर ते धाडकन खाली आपटले. त्यांचे म्हणणे आहे, कोणत्या तरी झाडाला अडकून कोसळले. असा अहवाल पाहिल्यानंतर त्यांना फटके मारले पाहिजेत. हा सत्य लपवण्याचा व दडपण्याचा प्रकार आहे हे या अहवालातून दिसते. या अहवालावर चर्चा व्हावी अशी मागणी आम्ही करू, असे वडेट्टीवार म्हणाले. एएआयबीने आपल्या 22 पानी अहवालात म्हटले आहे की, बारामती विमानतळावरील कमी दृश्यमानता, व्हीएफआर नियमांचे उल्लंघन, एअरफिल्ड अपुऱ्या सुविधा, स्वतंत्र MET सुविधेचा अभाव यामुळे ही विमान दुर्घटना घडली. विशेषतः अपघातावेळी हे विमान अगोदर झाडांवर कोसळले. त्यानंतर ते खाली पडून त्याला आग लागली, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## किंतूरमध्ये शोककळा : खामेनींच्या निधनाने हादरलेलं बाराबंकीतील गाव

**मुंबई (दै. संध्या)**

इस्रायल-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणचे सर्वोच्च नेते आणि धर्मगुरू अयातुल्ला अली खामेनींच्या मृत्यूच्या बातमीने उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील किंतूर गावात शोककळा पसरली. खामेनींचे आजोबा सय्यद अहमद मुसावी हिंदी यांचे मूळ या गावाशी संबंधित असल्याची माहिती आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इस्रायली हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर जागतिक स्तरावर खळबळ उडाली आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष तीव्र होत असताना या घटनेचे पडसाद भारतातही उमटले आहेत. विशेषतः उत्तर प्रदेशातील



बाराबंकी जिल्ह्यातील किंतूर हे छोटेसे गाव शोकाकुल झाले आहे. बाराबंकीच्या सिरौली गौसपूर तहसीलमधील किंतूर गावाचा खामेनी कुटुंबाशी ऐतिहासिक संबंध असल्याचं सांगितलं जातं. अयातुल्ला खामेनी यांचे आजोबा सय्यद अहमद मुसावी हिंदी हे 18व्या-19व्या शतकात याच गावात राहत होते, अशी माहिती स्थानिकांकडून दिली जाते.

# मिरजेत ४१ लाखांचे अवैध मद्य जप्त

**सांगली (दै. संध्या)**

गोव्यात तयार केलेले आणि राज्याचा महसूल चुकवून नागपूरसाठी नेण्यात येणारे सुमारे ४१ लाखांच्या मद्याची तस्करी उत्पादन शुल्क विभागाने उघडकीस आणून मालमोटारीसह ७१ लाख ३६ हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला. मद्य तस्करी करत असताना औषधांची बनावट देयके मालमोटारीत होती, तर बनावट नोंदणी क्रमांकाचा फलकही मालमोटारीतून जप्त करण्यात आले असल्याची माहिती दारू बंदी व उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक प्रदीप पोटे यांनी रविवारी सांगितले.

रविवारी सकाळी मिरज म्हैसाळ मार्गावर रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्गावर एका मालमोटारीतून गोवा निर्मिती मद्य वाहतूक होत असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली. या माहितीच्या आधारे उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने माल वाहतूक करणारा कंटेनर (एमएच ४० सीटी २८१४) अडवून चौकशी केली असता चालकाने कंटेनरमध्ये औषधे असल्याचे सांगून औषधांची देयके दाखवली. मात्र, तरीही पथकाने वाहनाची तपासणी केली असता आतमध्ये मद्य साठा आढळून आला.

महाराष्ट्र राज्याचा महसुल चुकवुन आयात करीत असताना विविध प्रकारचे देशी दारु मिळून आले आहे. त्यामध्ये कोंकण संत्रा ९९९, रॉकेट संत्रा, सिमला संत्रा, गोवा नं. १ संत्रा देशी दारु या विविध प्रकारचे देशी दारुचा मद्यसाठा मिळून आला. त्याची एकूण किंमत रु.४१ लाख ३६ हजार रूपये आहे. तसेच वाहनामध्ये बनावट नंबर प्लेट क्र. एमएच ४६ बीएम ५७५१ व डब्ल्यूबी २३ एफ ७८७६ मिळून आल्या असून विविध तीन प्रकारची बनावट औषधांची बिले मिळून आली आहेत. त्यामध्ये अरिस्टो फार्मासिटिकल्स प्रा.लि. भोपाल मध्यप्रदेश, निकिता फार्मासिटिकल्स स्पेशालिटिज् प्रा.लि. नागपूर आणि रुसन फार्मा लिमिटेड अंकलेश्वर गुजरात या कंपन्यांच्या नावाची बनावट औषधांची बिले मिळून आली आहेत.

सदर गुन्ह्यामध्ये गोवा निर्मित मद्यसाठा व वाहनासह एकूण रु. ७१ लाख ३६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. बेकायदा मद्य वाहतूक केल्या प्रकरणी वाहन चालक लभजित गुरमेज सिंह (वय ३२ रा. पिलभित, उत्तरप्रदेश) याला ताब्यात घेण्यात आले आहे. अवैध मद्या बाबत चौकशी केली असता त्याने हा मुद्देमाल गोवा राज्यातून आणला असून पुढे नागपूर या ठिकाणी घेऊन जाणार असल्याची माहिती सांगितली आहे.

महसूल चुकवून गोव्यातून होत असलेली तस्करी उघडकीस आणत मिरजेत सुमारे ४१ लाखाचे मद्य जप्त करण्यात आले.



## संपादकीय

# आर्थिक विश्वासार्हतेचा पाया

मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे. शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वर्षासाठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय-टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे.

## संस्कृत सुभाषित

अनित्यं यौवनं रुपंजीवितं द्रव्यसंचय:
आरोग्यं प्रियसंवासो गृध्येत्तत्र न पंडित: ।।
(शांतीपर्व, अध्याय ३३०, १४, महाभारत)

अर्थ – तारुण्य, रुप, आयुष्य, संपत्ती व प्रियजनांचा सहवास हे सर्व अशाश्वत आहे. शहाण्या पुरुषाने त्याचा लोभ धरू नये.

## आगामी साप्ताहिकी

२ मार्च २०२६ सोमवार
होळी
हुताशनी पौर्णिमा
दत्त महाराज कविश्वर पुण्यतिथी – पुणे
पौर्णिमा प्रारंभ सायं ५.५५

३ मार्च २०२६ मंगळवार
धूलिवंद
चैतन्य जयंती
खग्रास चंद्रग्रहण
पौर्णिमा समाप्ती ५.०७

४ मार्च २०२६ बुधवार
वसंतोत्सवारंभ
अभ्यंगस्नान
आम्रकुसुम प्राशन
ग्रहण करिदिन
राष्ट्रीय सुरक्षा दिन

५ मार्च २०२६ गुरुवार
संत तुकाराम बीज
बीजोत्सव – देहू जळू (अमरावती)

६ ऑगस्ट २०२० शुक्रवार
छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तिथीप्रमाणे)
अंगारक संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ०९.१६
मुंबई २१.४४
अकोला २१.०३
अमरावती २१.००
अहमदनगर २१.११

## उपदेशकथा

### बळीची अवस्था

राजा बळी महान व्यक्तिमत्व असलेला पूज्य पुरुष होता. भगवान विष्णूने वामनरूप घेतले आणि बळीला पाताळात लोटले. त्याची मनास्थिती कशी आहे हे पाहण्यास विष्णू नारदाला म्हणाला, 'नारदा ! एकदा बळीला भेटून ये.' त्याप्रमाणे नारद बळीकडे गेले. बळीने त्यांचे स्वागत केले व येण्याचे कारण विचारले. नारद म्हणाले, 'तू राज्यभ्रष्ट झालास. तुझे सर्व गमावले. आता तू कसा राहातोस हे प्रत्यक्ष पहावे म्हणून मी आलो.' आपली अवस्था सांगताना बळी म्हणाला, 'नारदा ! मी खरोखर समाधानी आहे. कारण जीवनामध्ये कोणतीही वस्तू ास्थिर नाही. कोणतीही घटना निश्चित नाही. काळ सर्वांवर स्वामित्त्व गाजवतो. काळाचे अद्भुत रहस्य ओळखून मी कोणत्याही अवस्थेचे फार सुख-दु:ख करीत नाही. काळ देतो व तोच हरण करतो. भविष्याच्या पोटात काय असते कोणास ठाऊक ! म्हणून मी देह काळाच्या स्वाधीन करून मनाने स्वरूपचिंतन करतो. मला काळाचे बंधन नाही.'

कथा उपदेश : भक्ताला काळाचे बंधन नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| २ मार्च २०२६ | करण:वणिज १७:५५:५४ |
| सोमवार | करण:विष्टि २९:२८:१९+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:कुम्भ |
| फाल्गुन शके | चन्द्र:सिंह०७:५१:१३ |
| संवत्– १९४७ | हिजरी सन् – १४४५ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | मुस्लिम मास – रमजान |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – १२ |
| मास– फाल्गुन | विशेष |
| ऋतु– सौर वसंत | होळी |
| शुक्ल पक्ष | हुताशनी पौर्णिमा |
| तिथि:चतुर्दशी १७:५५:५४ | दत्त महाराज कविश्वर |
| नक्षत्र:आेषा ०७:५१:१३ | पुण्यतिथी – पुणे |
| योग:अतिगण्ड १२:१८:३६ | पौर्णिमा प्रारंभ सायं ५.५५ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | | 5 | 7 | | 1 |
| 6 | | 7 | 9 | | | | 5 | |
| | | | | | | 2 | | 6 |
| 4 | 7 | | 6 | 5 | 9 | | | 3 |
| | | | 1 | | 2 | | | |
| 5 | | | 4 | 8 | 7 | | 1 | 9 |
| 3 | | 8 | | | | | | |
| | 6 | | | | 3 | 9 | | 5 |
| 9 | | 2 | 5 | | | | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८७४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 1 | 2 | 3 | 6 | 5 | 9 | 7 |
| 6 | 9 | 2 | 1 | 5 | 7 | 3 | 4 | 8 |
| 5 | 3 | 7 | 9 | 8 | 4 | 2 | 1 | 6 |
| 3 | 8 | 5 | 4 | 7 | 9 | 1 | 6 | 2 |
| 7 | 6 | 4 | 3 | 2 | 1 | 9 | 8 | 5 |
| 2 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 4 | 7 | 3 |
| 9 | 7 | 3 | 8 | 1 | 2 | 6 | 5 | 4 |
| 1 | 2 | 8 | 6 | 4 | 5 | 7 | 3 | 9 |
| 4 | 5 | 6 | 7 | 9 | 3 | 8 | 2 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९१ – पॅरिसमध्ये सेमाफोर यंत्राचे प्रथमत- प्रात्यक्षिक.
- १८३६ – टेक्सासच्या प्रजासत्ताकने स्वत–ला मेक्सिको पासून स्वतंत्र जाहीर केले.
- १८५५ – अलेक्झांडर दुसरा रशियाच्या झारपदी.
- १८६१ – झार अलेक्झांडर दुसऱ्याने रशियातील गुलामगिरी बंद केली.
- १८७७ – राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रतिस्पर्धी सॅम्युएल जे. टिल्डनला मताधिक्य असूनही अमेरिकन काँग्रेसने रदरफोर्ड बी. हेसला अध्यक्षपदी बसवले. .

### राष्ट्रीय

- २००७ – चेन्नईच्या लक्ष्मीचा अखंड ३० तास लिहण्याचा विक्रम.
- २००८ – भारताने दुसऱ्यांदा अंडर–१९ विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकण्याचा बहुमान मिळविला. पावसाने अडथळा निर्माण केलेल्या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला १२ धावांनी पराभूत केले.

### जन्म

- १३१६ – रॉबर्ट दुसरा, स्कॉटलंडचा राजा यांचा जन्म.
- १४५९ – पोप एड्रियान सहावा यांचा जन्म.
- १७९३ – सॅम ह्युस्टन, टेक्सासचे प्रजासत्ताकचा अध्यक्ष यांचा जन्म.
- १८१० – पोप लिओ तेरावा यांचा जन्म.

### निधन

- ८५५ – लोथार, पवित्र रोमन सम्राट यांचे निधन.
- १७३० – पोप बेनेडिक्ट तेरावा यांचे निधन.
- १७९१ – जॉन वेस्ली, मेथोडिस्ट चर्चचा स्थापक यांचे निधन.
- १८३५ – फ्रांसिस दुसरा, पवित्र रोमन सम्राट यांचे निधन.
- १९२१ – निकोलस पहिला, मॉंटेनिग्रोचे राजा यांचे निधन.

## : SMS :

Baba koi aisi job batao,jahan mujhe kaam na karna pade..log apna kaam khud kare,aur mujhe paise bhi de...
SWAMI ji : jao beta..SULABH SHOUCHALA KHOL DE..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.८ | १८.२ |
| अहमदनगर | २९.६ | १७ |
| अकोला | ३४ | २१.५ |
| अमरावती | ३३.४ | २२.९ |
| बीड | ३४.३ | २३.१ |
| भंडारा | ३२.६ | २०.७ |
| बुलढाणा | २८.५ | १५.९ |
| चंद्रपूर | ३३.७ | २३.३ |
| चेन्नई | ३५.८ | २०.८ |
| नवी दिल्ली | २९.५ | १७.७ |
| धुळे | ३०.५ | १८.४ |
| गोंदिया | ३१.५ | २०.१ |
| जळगाव | ३३.८ | २०.४ |
| कोल्हापूर | ३०.५ | १६ |
| लातूर | ३०.९ | १९.६ |
| मुंबई | २९.४ | २३.९ |
| नागपूर | ३२.८ | २०.९ |
| नांदेड | ३३.३ | २२.२ |
| नंदूरबार | २८ | १८.८ |
| नाशिक | २८.८ | १५.६ |
| पुणे | २८.५ | १५.३ |
| पंढरपूर | ३१.४ | १९.४ |
| सातारा | ३१.३ | १४.२ |
| सांगली | ३२.२ | १७.४ |
| सोलापूर | ३२.१ | २१.७ |
| वर्धा | ३३.९ | २२.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील.

**वृषभ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल.

**मिथुन :** शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: दक्षिण
सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. संधी उपलब्ध होतील.

**कर्क :** शुभ रंग : लाल,शुभ दिशा:पश्चिम
शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील.

**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: दक्षिण
उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:दक्षिण
श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
व्यापारात अचानक फायदा होईल. अपूर्ण राहीलेली कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल.


**धनु :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल.

**मकर :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणाचाही राग करू नका.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:दक्षिण
आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७५



### आडवे शब्द

२. बेशिस्त वाढ
४. स्वामी, धनी
७. बिनतेला–तुपाची पोळी
९. उरलेले
१०. संत तुकारामांचे गाव
११. मैद्याची भलीमोठी मऊ रोटी
१२. आकाश
१४. थकवा
१५. ग्रंथातून उद्धृत केलेला अंश
१७. पाठवणी
२०. लांब
२१. दाढी करण्याचे आयुध
२२. सीता
२४. संपूर्ण
२५. प्रवाह
२६. देव
२८. अस्थमा
२९. शेकडा प्रमाण
३०. सोबत
३१. बुटका
३२. सत्त्व
३४. लवण
३६. ताट
३८. थंडी
३९. प्रतिबंध
४०. बैठकीच्या खोलीतील छोटे टेबल
४२. मेव्हणीचा पती
४५. वृश्चिक नंतरची रास
४७. बुद्धी
४८. उशीचा अंगरखा
४९. जरूरी
५१. लाख
५३. गाणे
५५. मांजरी
५६. वाहन
५७. पंख
५९. तोंड
६०. बेसावध
६१. पाणी
६३. शस्त्राचा घाव
६४. दरवर्षी
६६. ग्लानी
६९. नांगर
७०. चालू दिवस
७२. स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणादायी घोषणा
७३. वैपुल्य
७७. ज्वर
७९. बुरखा
८०. विमानातील सेविका
८२. क्रोध, ८४. प्रहार
८६. चिकार, ८८. चाकू
८९. भूमी
९०. मोठा किंवा प्रमुख रस्ता
९२. मृदंग
९४. महाग
९५. अनुरूप
९८. रक्तवाहिनी
९९. बुबुळाचा आजार
१००. स्वयंपाकी
१०१. मोगऱ्याचा सर
१०२. पकड!
१०४. लढाऊ नेपाळी जमात
१०५. शैली
१०६. उपयोग, उपभोग
१०७. वानवा, चणचण
१०८. वस्ती, आळी (हिंदी)
१०९. रमलेला
११०. खूप, दाट उदा.झोप वा प्रेम
१११. आर्जव

### उभे शब्द

१. सगळीकडे
२. आटोपशीर, थोडक्यात
३. मजला पण 'मला' नाही
४. हत्ती हाकणारा
५. दयनीय
६. भव्य
७. शत्रूला सामील
८. अरण्य
१०. परंपरेने संरक्षित वनक्षेत्र
१३. स्वर्गातून गंगा आणणारा राजा
१५. शेवट
१६. रामाचे कुल
१८. वृद्धी
१९. द्वितीय
२०. अगदी बावळट
२१. अवांतर, बाकीचे
२२. जावई
२३. कीडा
२७. पांडवांनी या झाडात शस्त्रे लपवली होती
३०. सज्ज, दक्ष
३३. भिडू
३५. शिक्का
३७. बलाकपक्षी
३९. हुकूम
४०. गुंफा
४१. भेग
४३. मुलीची कर्णभूषणे
४४. तळतळाट
४६. नवीन
४७. जुन्या, मागास विचारांचा
४८. विलंब
५०. नामस्मरण
५२. माफी
५३. सिनेमातील हिरोचा लाडका गोड पदार्थ
५४. आश्चर्य
५५. कपाळ
५६. कपोल
५८. दाणेदार
६१. पोहणे
६२. महान
६५. वर्ष
६६. वात्सल्य
६७. रानरेडा
६८. शंकराचा प्रिय वृक्ष
७१. मोठ्या प्रमाणावरील चोरी इ.
७३. रेखा, रेघा
७४. चर्या
७५. पृथ्वी
७६. डुक्कर
७८. उद्यानंतरचा दिवस
७९. मधुर
८१. खळगा
८३. जाणे
८४. बंदुकीची मागची बाजू
८५. वस्त्र
८७. गोंगाट
८८. लहान चाकू
९१. प्रसिद्ध बंगाली मिठाई
९३. वाळा
९४. महागाई
९५. कोल्हापुरी दागिना
९६. भीमाने ठार केलेला मगध देशीचा राजा
९७. तहानेने घशाला पडलेली
९९. गोदाम
१०१. उष्ण
१०२. जमीन
१०३. जपानी कुस्ती
१०५. शर, तीर

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रातोरात ४.छायाचित्र ६.जन गण मन ११.रुपाया १३.नवार १४.जर १५.खराब १७.भारवाहक १९.जून २१.दलाल २३.जमा २५.शाहीर २७.कडकड २९.मतदार ३१.नगद ३२.कारण ३४.धनी ३५.कर्म ३६.पाळीव ३८.विणकर ४०.पालम ४२.लघु ४३.जुना ४४.मातीमोल ४६.नगर ४८.तनय ५१.यमल ५२.हकनाक ५४.आजतक ५६.किसान ५८.गवगवा ५९.परागंदा ६०.धमाल ६१.तेरडा ६२.नत ६४.अननस ६५.सर ६६.आज ६७.प्रवाह ६९.कबरस्तान ७१.सर ७२.नरबळी ७४.दर्द ७५.जनककन्या ७८.तलाशी ७९.समस्त ८०.नातलग ८१.रमा

उभे उत्तर : २.तोतरा ३.तरू ४.छाया ५.चिक्कार ६.जनकजननी ७.नवा ८.गरजू ९.मज १०.नरवर १२.पायल १५.खडक १६.बदक १७.भारत १८.वावर २०.नशा २२.लाडका २४.माग २६.हीरक २८.डहाळी २९.मण ३०.दाभण ३३.रस्सी ३४.धरती ३६.पाळत ३७.वलय ४१.मनकवडा ४५.मोहन ४७.रविवासर ४९.नजरानजर ५०.तेज ५३.नागर ५४.आदानप्रदान ५५.तक्क्या ५७.सालस ६०.धनवान ६१.तेजाब ६३.तवा ६५.सनदशीर ६६.आसपास ६८.हस्तक ६९.कळी ७०.रयत ७३.रचना ७५.जस्त ७६.कट्टा ७७.न्यायी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### तरुणांच्या तत्परतेमुळे रोकड लुटीचा डाव उधळला; चंदननगर भागातील घटना

पुणे (दैनिक संध्या) : बँकेतून निघालेल्या तरुणाकडील १५ लाख रुपयांची रोकड लुटण्याचा डाव नागरिकांच्या तत्परतेमुळे उधळला गेला. चंदननगर परिसरात ही घटना घडली. प्रसंगावधान राखून तरुणाने विरोध केल्यानंतर चोरटे दुचाकीवरून पसार झाले. याबाबत एका तरुणाने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार २३ वर्षीय तरुण एका खासगी कार्यालयात नोकरी करतो. तो वडगाव शेरी परिसरात राहायला आहे. २७ फेब्रुवारी रोजी कार्यालयीन कामकासाठी त्याला बँकेतून रोकड काढून आणण्यास सांगितले होते. रोकड काढल्यानंतर तो दुपारी दोनच्या सुमारास वडगाव शेरीतील श्री हनुमान मंदिर परिसरात आला. त्या वेळी दोन दुचाकीवरून चौघे जण आले. एका चोरट्याने तरुणाला तीक्ष्ण शस्त्राचा धाक दाखविला. तक्रारदार तरुणाला धमकावून चोरट्याने त्याच्याकडील १५ हजारांची रोकड असलेली पिशवी हिसकावून नेण्याचा प्रयत्न केला. तरुणाने प्रसंगावधान राखून चोरट्याला धक्का दिला. दुचाकीवरील दोन चोरटे रस्त्यात पडले. त्यानंतर तक्रारदार तरुणाने दुचाकी सुरू केली. त्याने ऑक्सिजन पार्कजवळील एका चहाच्या टपरीवर दुचाकी थांबविली.

### पीएमपी प्रवासी ज्येष्ठाला धक्काबुक्की करुन 50 हजारांची रोकड लुटली

पुणे (दैनिक संध्या) : पीएमपी प्रवासी ज्येष्ठाला धक्काबुक्की करुन चोरट्यांनी ५० हजारांची रोकड लुटल्याची घटना विश्रांतवाडी भागात घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७३ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे विश्रांतवाडीतील धानोरी भागात राहायला आहेत. ते २६ फेब्रुवारी रोजी दुपारी विश्रांतवाडी ते कोथरूड या मार्गावरील बसमधून प्रवास करत होते. बस प्रवासात चोरट्यांनी त्यांना धक्का दिला. धक्काबुक्की करुन खिशातील ५० हजारांची रोकड काढून घेतली. चोरटे शांतीनगर परिसरातील बस थांब्यावर उतरुन पसार झाले. घाबरलेल्या ज्येष्ठाने पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलीस हवालदार भोसले तपास करत आहेत.

### एसटी प्रवाशाची सोनसाखळी चोरी

पुणे (दैनिक संध्या) : एसटी प्रवाशाच्या गळ्यातील ८३ हजार रुपयांची सोनसाखळी चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना वाकडेवाडी एसटी स्थानकाच्या आवारात घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार हे मूळचे नाशिकचे आहेत. ते २८ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास वाकडेवाडी एसटी स्थानकाच्या आवारात थांबले होते. त्या वेळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरून नेली. पोलीस कर्मचारी तागड तपास करत आहेत.

### सांडपाणी नाल्यात सोडल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिका विरुद्ध गुन्हा

पुणे (दैनिक संध्या) : गृहप्रकल्पाच्या बांधकामा दरम्यान सांडपाणी नाल्यात सोडल्याप्रकरणी मुंढव्यातील एका बांधकाम व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंढव्यातील केशवनगर भागात २०२४ पासून एका गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे. या ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांसाठी तात्पुरत्या स्वरूपाची निवास व्यवस्था (लेबर कॅम्प) करण्यात आली आहे. नियमानुसार सांडपाणी, तसेच स्वच्छतागृहातील पाण्याची योग्यरित्या विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. मात्र, बांधकाम व्यावसायिकाने बांधकामात वापरले जाणारे रसायनमिश्रित सांडपाणी, तसेच स्वच्छतागृहातील पाणी जवळच असलेल्या नाल्यात सोडल्याचा आरोप तक्रारदाराने केला होता. गेल्या काही महिन्यांपासून या सांडपाण्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये डेंग्यू, मलेरिया, तसेच जलजन्य आजारांची भीती वाढली आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान आणि सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण केल्याप्रकरणी तक्रारदाराने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला, अशी माहिती मुंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता वासनीक यांनी दिली.

### 'मोफत'ची खैरात बंद करून उद्योग करमुक्त करा! उद्योगपतीने टोचले सरकारचे कान

पुणे (दैनिक संध्या) : 'सर्व राज्यांकडून जनतेला मोफत गोष्टींची खैरात केली जात आहे. या मोफत गोष्टी पाच वर्षांसाठी बंद करून त्यातून उद्योगांना पाच वर्षांसाठी कंपनी कर माफ करावा. हे पाऊल उचलल्यास देशातील उद्योग जागतिक पातळीवर आघाडी घेतील,' अशा शब्दांत कोवॅक्सिन लसीचे निर्माते व 'भारत बायोटेक'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कृष्णा एल्ला यांनी मोदी सरकारचे कान टोचले. 'पुणे इंटरनॅशनल सेंटर'च्या वतीने आयोजित 'एशिया इकॉनॉमिक डायलॉग'मध्ये डॉ. एल्ला यांची मुलाखत सिम्बायोसिसच्या प्रधान संचालिका डॉ. विद्या येरवडेकर यांनी घेतली. त्या वेळी ते बोलते होते.

## खडकवासला जलाशय रक्षणासाठी 'हिंदु जनजागृती समिति' सज्ज

### अभियानाचे यंदा २४ वे वर्ष! : जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन तसेच खडकवासला पाटबंधारे विभागाचे मोहिमेस सहकार्याचे आश्वासन !

**पुणे (दै. संध्या) :**




धूलिवंदन आणि रंगपंचमी या दिवशी रंग खेळून खडकवासला जलाशयात आंघोळीसाठी येणे हा प्रकार पर्यावरणाला हानीकारक आहे. संपूर्ण पुणे शहराला पाणीपुरवठा करणारा जलस्रोत प्रदूषित होऊ नये, याचे भान रंग खेळणाऱ्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीप्रमाणे आनंदाने सण साजरे करतांना सर्वांनी सण-उत्सवांमध्ये शिरलेल्या अपप्रकारांना थांबवणेही आवश्यक आहे. यासाठी पुणे येथे गेली 23 वर्षे सातत्याने आणि यशस्वीपणे चालू असलेले 'खडकवासला जलाशय रक्षण अभियान' यंदाच्या वर्षीही सर्वांच्या सहभागाने राबवण्यात येणार आहे, असे श्री. पराग गोखले यांनी सांगितले.

खडकवासला जलाशय रक्षण अभियानाचे यंदाचे हे 24 वे वर्ष असून 3 मार्च (धूलिवंदन) आणि 8 मार्च (रंगपंचमी) या दोन्ही दिवशी सकाळी 9.00 ते सायंकाळी 6.30 पर्यंत खडकवासला जलाशयाच्या भोवती मानवी साखळी करून हातात प्रबोधनात्मक फलक घेऊन जलाशयाचे रक्षण करण्यासाठी प्रबोधन करणार आहेत. हिंदु जनजागृती समितीने आरंभ केलेला हा उपक्रम अन्य समविचारी संघटना, खडकवासला ग्रामस्थ, स्थानिक प्रशासन, पाटबंधारे खाते आणि पोलीस प्रशासन यांच्या सहकार्याने 100 टक्के यशस्वीपणे पार पडत आहे.

या संदर्भात हिंदु जनजागृती समिती आणि हिंदुत्वनिष्ठ यांच्या वतीने पुणे येथे प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेला निवेदन देण्यात आले. यामध्ये मा. जिल्हाधिकारी कार्यालय (पुणे), मा. तहसीलदार कार्यालय (हवेली), मा. सहाय्यक पोलीस उपायुक्त (विशेष शाखा, पुणे शहर), मा. पोलीस अधीक्षक (पुणे ग्रामीण), मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक (नांदेड सिटी पोलीस ठाणे, सिंहगड रस्ता) आणि मा. कार्यकारी अभियंता (खडकवासला पाटबंधारे विभाग) या सर्व संबंधित विभागांना निवेदन देण्यात आले आहे. या अभियानात निश्चित सहकार्य करू असे त्यांनी सांगितले.

या अभियानात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होण्यासाठी, तसेच अन्य माहितीसाठी (89833 35517) या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन श्री.पराग गोखले यांनी केले आहे.

## सार्वजनिक आरोग्य विभागाचे मोठे पाऊल

**पुणे (दै. संध्या) :**

सार्वजनिक आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रशासकीय व सेवाविषयक तक्रारी असतात. या तक्रारी प्रलंबित राहिल्याने कर्मचाऱ्यांच्या निवृत्तवेतन लाभाला फटका बसतो. तसेच सद्य:स्थितीत कर्मचाऱ्यांच्या तक्रारी प्रलंबित राहिल्याने त्यांच्या कामावर परिणाम होतो. यामुळे आरोग्य विभागाच्या पुणे परिमंडळाने कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेमुळे कर्मचाऱ्यांवरील ताण कमी होऊन त्यांच्या सेवेचा दर्जा सुधारण्यास मदत होईल, अशी आरोग्य विभागाची अपेक्षा आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय तक्रारींचे निवारण करण्यासाठी आरोग्य अदालत मोहीम सुरू करण्यात आली आहे. यात प्रशासकीय पंचसूत्री कार्यप्रणाली राबवून तक्रारी निकाली काढण्यात येत आहेत. आरोग्य विभागाच्या पुणे परिमंडळाचे उपसंचालक डॉ.भगवान पवार यांनी ही मोहीम सुरू केली आहे. पुणे परिमंडळात पुणे, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून ७ एप्रिलपर्यंत ५००१ तक्रारी निकाली काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## फर्ग्युसन रस्त्यावरील एका मोठ्या चौकात खोदाई सुरू

**पुणे (दै. संध्या) :**




वाहतूक पोलिसांना कोणतीही पूर्वकल्पना न देता श्री संत ज्ञानेश्वर पादुका चौक परिसरात रस्ते खोदाई करुन वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरल्याप्रकरणी खासगी गॅस पुरवठादार कंपनीच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. शिवाजीनगर भागातील श्री संत ज्ञानेश्वर पादुका चौकातून मॉडर्न महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर २७ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊच्या सुमारास गॅस पुरवठादार कंपनीच्या ठेकेदाराने खोदाई सुरू केली. दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असल्याने पालकही सकाळी परीक्षा केंद्रावर निघाले होते. या भागात शाळा, महाविद्यालय असल्याने कोंडी झाली. नामदार गोपाळकृष्ण गोखले रस्त्यावरुन शिवाजीनगरकडे जाणारी वाहतूक विस्कळीत झाली. वाहतूक पोलिसांना या घटनेची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक नियोजन केले. वाहतूक विस्कळीत झाल्याने सकाळी कामावर निघालेले नागरिक, तसेच पालकांना कोंडीत अडकून पडावे लागले होते. पूर्वसूचना न देता अचानक गॅस पुरवठादार कंपनीने ठेकेदारामार्फत रस्ते खोदाई सुरू केल्याचे निदर्शनास आल्यानंतर वाहतूक पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला. रस्ते खोदाई करण्यापूर्वी वाहतूक पोलीस उपायुक्त कार्यालय, तसेच संबंधित भागातील वाहतूक विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, गॅस कंपनीने वाहतूक पोलिसांकडून परवानगी घेतली नसल्याने ही कारवाई करण्यात आली, अशी माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.

## पहिले मॅकडोनाल्ड ते श्रीराम लागूंचे घड्याळ... ही गोष्ट आहे ६० वर्षांच्या बदलाची !

**पुणे (दै. संध्या) :**



पुण्यात एक रस्ता आहे, ज्याचे कौतुक होते, ते त्याच्यावर न पडलेल्या खड्ड्यांमुळे. पण, त्याचे महत्त्व तितकेच नाही. तो बदलांचा साक्षीदार आहे आणि बदल घडूनही इतिहासाच्या पाऊलखुणा टिकवून आहे. या रस्त्यावरील भरपूर झाडे तशीच आहेत. पण, व्हाइब काहीशी बदलते आहे. सद्गुरू जंगली महाराजांची समाधी असलेल्या या रस्त्यावर जुन्या-नव्याचा अनोख संगम घडतो आहे. याच रस्त्यावर पुणेकरांना जागतिकीकरणाची पहिली पावले अनुभवायला मिळाली. ऐसपैस जागा, जुने वाडे, बंगले आणि जगभरातल्या कंपन्यांची, ब्रँड्सची कार्यालये, दालने असलेल्या जंगली महाराज रस्त्यावर अनेक कहाण्या आकाराला आल्या, येत आहेत.

सन १९६१. पानशेतच्या पुराने पुण्याचा तोंडवळा बदलला. कित्येकांची स्वप्ने पाण्याखाली गेली. मुळा-मुठेच्या काठावर वसलेल्या पुण्यनगरीच्या अवाढव्य विकासाला बसलेला हा पहिलाच तडाखा. १९५२ पासून जंगली महाराज रस्त्यावर दिमाखात उभ्या असलेल्या तीन मजली 'प्रकाश लॉज'ची देखणी इमारतही या पुराची साक्ष. इमारतीचा पहिला मजला पाण्याखाली गेलेला. त्या वेळी पाण्यात बुडालेल्या पुण्याच्या विकासाला नवा आकार देण्याची जबाबदारी पुणे महापालिकेचे पहिले आयुक्त स. गो. बर्वे यांनी समर्थपणे पेलली. त्यांच्या नावाचा चौकातच या रस्त्याचा प्रारंभ. त्यांच्या कार्याचे स्मरण ठेवणारा. पुढे स. गो. बर्वे असा नीलफलक असलेला बंगला पुणेकरांनी अनुभवलेल्या या द्रष्ट्या प्रशासकाची कहाणी सांगतो.

थोडे पुढे आल्यावर हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणारा 'अलबेला' मराठी संगीतकार सी. रामचंद्र यांचा बंगलाही याच रस्त्यालगत. थोड्या आतल्या बाजूला. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जवळचे सहकारी ज्येष्ठ समाजसेवक कृष्णराव गांगुर्डे, स्वातंत्र्यसेनानी बापुसाहेब गुप्ते यांच्या नावाचे परिसरातील नीलफलकही पुण्यातील सामाजिक-राजकीय चळवळींचा पडद्याआडचा इतिहास सांगणारे. अलीकडच्या काळात बालगंधर्व रंगमंदिरासमोर झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्याजवळची जागा अनेक आंदोलने, निदर्शनांमुळे परिचित. प्रदर्शने असोत, की पथनाट्ये, त्यासाठीही जंगली महाराज रस्ता कायम आकर्षणाचा केंद्रबिंदू. नुकत्याच पार पडलेल्या सायकल स्पर्धेचा समारोपही याच रस्त्यावर झाला. विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यापासून पुण्यातील घडामोडींचा मध्यबिंदू म्हणून हा रस्ता चर्चेत आहेच.

काही कहाण्या माणसांच्या मनावर कोरल्या गेल्याने विस्मरणात जात नाहीत. महानगरांच्या अथक घुसळणीत वर्तमानाशी धागा जोडण्यासाठी त्यांचे महत्त्व अधिकच. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याजवळच्या डायमंड वॉच कंपनीत अशा अनेक कहाण्या आजही जिवंत होतात. 'तेव्हा रिस्ट वॉचचा जमाना होता. सोन्यासारख्या चमकणाऱ्या घड्याळांसाठी नवरदेव रुसून बसायचे. एचएमटी विजय, एचएमटी कांचन अशी घड्याळे मोठमोठ्यांच्या मनगटावर शोभून दिसायची. प्रसिद्ध अभिनेते श्रीराम लागू त्यांचे घड्याळ इथूनच घेऊन जायचे. त्यांना चेन असलेले, ॲनालॉग घड्याळ लागायचे. राजकारण्यांनाही घड्याळांची हौस. आमच्या कंपनीत सगळ्याच विचारांचे लोक जमायचे. मोहन धारियांना भिंतीवरच्या घड्याळात झाड कोरून हवे असायचे. 'वनराई'तल्या प्रत्येक पाहुण्याला ते हेच घड्याळ द्यायचे...' चाळीस वर्षांपासून डायमंड वॉच कंपनीत काम करणारे सुभाष लायगुडे आठवणींचा पट उलगडत राहतात... 'प्रत्येकाची एक वेळ असते. पूर्वी वीस-वीस जण काम करायचो, तरी गर्दी ओसरायची नाही. आता तिघेच आहोत. धंदा कमी झालाय.' जुन्या धाटणीच्या डॉयमंड वॉच कंपनीच्या भिंतींवर लटकवलेल्या घडाळ्यांचे काटे आणि 'जस्ट इन टाइम'च्या चकचकीत दालनातील 'डिजिटल वॉच' महानगरीय बदलांची साक्ष देत राहतात.

डेक्कन पीएमपी थांब्याजवळ ३० वर्षांपासून अधिक काळ अत्तर विकणारे ए. रज्जाक सांगतात, 'पूर्वी वर्षातून एकदा दिवाळी, दसरा अशा सणांनाच सुंगध दरवळायचा, पर्फ्युमसाठी गर्दी व्हायची. आता मोबाइलच्या रिचार्जसारखं झालंय. रोज नवा सेंट हवा असतो.' रज्जाक यांनी महानगरांचा वेगवान बदल शांतपणे पचवलेला आहे.

रस्त्यावर आताशा गर्दी वाढली आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्या या रस्त्यावर जागा मिळवायला स्पर्धा करतायेत. काही दालने नव्याने सुरू झालेली दिसतात, तर डेल्सी पॅरिससारखी आंतरराष्ट्रीय कंपनी १९४२ पासून आपली नाममुद्रा इथे टिकवून आहे. 'मॅकडोनाल्ड'चे पुण्यातील पहिले दालन जंगली महाराज रस्त्यावरच उभे राहिले. आता तेही पुनर्विकासाला निघालेले दिसते. 'आर डेक्कन' नावाने शहरातला पहिला मॉल याच रस्त्यावर उभा राहिला. वाहतूक कोंडीचा मुद्दा कायम चर्चेत असलेल्या पुण्यात पादचाऱ्यांसाठी सोय म्हणून पहिला भुयारी पादचारी पूल 'गरवारे सर्कल'ही याच रस्त्यावर बांधण्यात आला आणि नव्या धाटणीचे पदपथही याच रस्त्याच्या कडेला थाटले गेले. त्या अर्थाने हा रस्ता सुधारणावादी.

पूर्वी हा रस्ता दुहेरी वाहतुकीसाठी खुला होता. नंतर मोठमोठ्या कंपन्यांची दालने वाढली, तशी गर्दी रस्त्यावर मावेनाशी झाली. 'आम्ही इथे खेळायचो, तेव्हा इमारतींचे बांधकाम सुरूच होते. नदी स्वच्छ होती. नदीत पोहणारे बरेच होते. आता नदीच्या बाजूने फिरणेही आवश्यक आहे,' बदलांच्या वेगाने निर्माण झालेला ताण सारिका व्हरगडे यांच्या बोलण्यात व्यक्त होतो. त्यांनी सांगितलेल्या बालपणाच्या आठवणींना हा ताण टिपला आहे. 'बदल घडतील. पण, आठवणींची जागा दुसऱ्या कशालाही घेता येत नसते,' इति सारिका.

इथली जुन्या-नव्याची सांगड घालणारी अनोखी 'व्हाइब'पाहून चीन, इंडोनेशिया अशा पूर्वेकडील देशांतून येणारे विद्यार्थी आणि जर्मनी, फ्रान्ससारख्या पश्चिमेकडील देशांमधून येणारे पर्यटकही थक्क होतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पुण्यात येणारा प्रत्येकजण चकचकीत रस्ते, उंचच उंच इमारती, मोकळे-ढाकळे पदपथ आणि शिस्तबद्ध वाहतुकीचे स्वप्न घेऊन इथेच विसावण्याचे स्वप्न उराशी बाळगतात. काही रुळलेली पावले मात्र परतीच्या ओढीने व्याकूळ आहेत. ती महानगरांच्या झगझगमगाटी वेगात थकलेली दिसतात.

'पांडुरंगाच्या आशीर्वादाने भरपूर कमावले. आता गावाची ओढ लागलीये. खडकवासल्याच्या नदीकिनारी असलेली शेती कसत, आयुष्याची अखेर शांतपणे काढायची आहे,' अशी सुभाष लायगुडे यांनी व्यक्त केलेली इच्छा उमेदीतल्या तरुणांना मोलाचा सल्ला देते.

## थेट अटकेची धमकी, ज्येष्ठाचे धाबे दणाणले, ११ कोटी गमावले; अखेर पोलिसांनी चोरट्यांना असे शोधून काढले!

**पुणे (दै. संध्या) :**




डिजिटल अॅरेस्टची भीती दाखवून शहरातील एका ज्येष्ठ नागरिकाची पावणे अकरा कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या सायबर चोरट्यांना सायबर गुन्हे शाखेने अटक केली. हर्षद सुभाष धनतोले (वय २३), समर्थ सुरेश देशमुख (वय २४, दोघे सध्या रा. कर्वेनगर, मूळ रा. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. आरोपी धनतोले, देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागातील (सीबीआय) अधिकारी असल्याची बतावणी केली होती. काळ्या पैशांच्या व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला असून, या प्रकरणात सीबीआयकडून अटक (डिजिटल अॅरेस्ट) करण्यात येणार असल्याची भीती दाखविण्यात आली होती. या प्रकरणात कुटुंबीयांनाही अटक करण्यात येणार असल्याचे सांगून आरोपींनी ज्येष्ठ नागरिक आणि त्याच्या कुटुंबीयांनी तातडीने चोरट्यांनी दिलेल्या बँक खात्यात रक्कम जमा करावी, असे सांगितले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकाने चोरट्यांच्या खात्यात दहा कोटी ७४ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. ज्येष्ठ नागरिकाने ज्या बँक खात्यात पैसे भरले होते. त्या खात्याची तांत्रिक तपासणी करण्यात आली, तसेच चोरट्यांनी शहरातील काही एटीएममधून पैसे काढले होते. पोलिसांनी संबंधित एटीएममधील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. सायबर पोलिसंच्या पथकाने तपास करून आरोपी धनतोले अणि देशमुख यांना अटक केली. त्यांच्याकडून चार लाख ७८ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. आरोपींच्या खात्यातील ४० लाख रुपयांची रक्कम गोठविण्यात आली आहे. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त विवेक मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे, पोलीस निरीक्षक संगीता देवकाते, सहायक निरीक्षक अर्चना कटके, उपनिरीक्षक सुशील डमरे, अजित बढे, कृष्णकांत देसाई, रवींद्र साळवी, जान्हवी भडेकर, गंगाधर काळे, नवनाथ कोंडे यांनी ही कारवाई केली.

## बटाटा, घेवडा, तोतापुरी कैरीच्या दरात घट

**पुणे (दै. संध्या) :**



मार्केट यार्डातील घाऊक बाजार बटाटा, घेवडा, तोतापुरी कैरीच्या दरात घट झाली. मागणी वाढल्याने काकडी आणि ढोबळी मिरचीच्या दरात वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर राहिले.

गुलटेकडीतील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेशातून १४ ते १५ टेम्पो हिरवी मिरची, राजस्थानातून ६ ते ७ टेम्पो गाजर, कर्नाटकातून ४ ते ५ टेम्पो कोबी, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथून ४ ते ५ टेम्पो शेवगा, कर्नाटक, तामिळनाडूतून २ ते ३ टेम्पो तोतापुरी कैरी, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा,३ ते ४ टेम्पो पावटा, कर्नाटक, गुजरातमधून प्रत्येकी ३ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून १४ ते १५ टेम्पो मटार, तसेच मध्य प्रदेशातून १४ ते १५ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून ७०० ते ८०० गोणी सातारी आले, भेंडी ६ ते ७ टेम्पो, गवार ४ ते ५ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, काकडी ६ ते ७ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, गाजर २ ते ३ टेम्पो, कोबी १० ते १२ टेम्पो, पावटा ३ ते ४ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, तांबडा भोपळा १४ ते १५ टेम्पो, गाजर २ ते ३ टेम्पो, नवीन आणि जुना कांदा मिळून १२५ टेम्पो अशी आवक झाली. तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ३० ते ३५ टेम्पो अशी आवक झाली.

मार्केट यार्डातील तरकारी विभागात मेथी, चाकवत, अंबाडी, तसेच हरभरा गड्डी या पालेभाज्यांच्या दरात घट झाली. कोथिंबीर, शेपू, कांदापात, करडई, पुदिना, मुळे, राजगिरा, चुका, चवळई, पालक या पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. पुणे विभागातून कोथिंबिरीच्या दीड लाख जुडी, मेथीच्या ८० हजार, तसेच ५ ते १० हजार हरभरा गड्डीची आवक झाली. पालेभाज्यांचे दर (शेकडा जुडी) – कोथिंबीर – ८०० ते १५००, मेथी – ८०० ते १२००, शेपू – ८०० ते १२००, कांदापात – १००० ते १५००, चाकवत – ४०० ते ७००, करडई- ५०० ते ८००, पुदिना – ३०० ते ५००, अंबाडी – ४०० ते ८००, मुळे – ८०० ते १५००, राजगिरा – ५०० ते ७००, चुका- ५०० ते ८००, चवळई – ४०० ते ७००, पालक – १००० ते १५००, हरभरा गड्डी – ८०० ते १५००.

मुस्लीम धर्मियांकडून रमजान महिन्यात उपवास केले जातात. उपवासामुळे फळांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. कलिंगड, खरबूची आवक वाढल्याने दरात किलोमागे पाच रुपयांनी घट झाली. मागणी नसल्याने चिकूचे दर कमी झाले. उन्हाचा चटका वाढल्याने लिंबांच्या मागणीत वाढ झाली आहे. फळबाजारात मोसंबी ४० ते ५० टन, संत्री २५ ते ३० टन, डाळिंब २० ते २५ टन, पपई २५ ते ३० टेम्पो, लिंबे ८०० ते १२०० गोणी, कलिंगड ६० ते ७० टेम्पो, खरबूज २५ ते ३० टेम्पो, चिकू तीन हजार गोणी, पेरू १५० ते २०० प्लास्टिक जाळी, अननस ६ ट्रक, स्ट्रॉबेरी ५ ते ६ टन, द्राक्षे ३० ते ३५ टन, बोरे २० पोती अशी आवक झाली.

# मराठी भाषा गौरव दिन कवी संमेलन व शेरोशायरीने संपन्न

**मराठी भाषेच्या जतन-संवर्धनाचा निर्धार, महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम**



**मुंबई (दै. संध्या) :**

महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ ( MMMPS ) या अखिल महाराष्ट्रातील अग्रगण्य पत्रकार संघटना ही संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय अशोक तोडणकर यांनी २००१ साली स्थापन करत समाजासाठी अनेक वर्षे त्यांनी काम करत त्यांच्या पश्चात आप्पासाहेब तोडणकर यांनी ती कार्यरत ठेवली व पत्रकार संघचे सध्याचे अध्यक्ष प्रकाश पाटकर यांच्या व अनेक पत्रकार बांधवांच्या माध्यमातून सध्या सामाजिक कार्य करत आहे, महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ च्या २५ व्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करत कवी संमेलन, शेरोशायरी व भावगीतांचा बहारदार कार्यक्रम उत्साहात व दिमाखात

लोअर परळ येथील आर्य समाज हॉल येथे शुक्रवार दिनांक २७,फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजता या वेळेत संपन्न झाला,

आर्य समाज हॉल येथे रंगलेल्या या साहित्य मैफलीला साहित्यप्रेमी, पत्रकार,कवी-लेखक व नागरिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली, या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे भायखळा मतदारसंघातील नगरसेवक रोहिदास लोखंडे,ज्येष्ठ कवी व माजी शिक्षणाधिकारी डॉ. जिवबा रामचंद्र केळुसकर, कवयित्री लेखिका व दैनिक "मुंबई मित्र" च्या संपादिका सौ.अनघा अशोक राणे, संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटकर,उपाध्यक्ष ॲड.सुनील शिर्के,प्रमुख कार्यवाहक अशोक भोसले, सहसचिव शशिकांत सावंत यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली,दीपप्रज्वलन करून आचार्य बाळशास्त्री जांभेकर तसेच संघटनेचे संस्थापक स्वर्गीय अशोक तोडणकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश वसंत पाटकर यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध साहित्यिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

प्रमुख पाहुणे डॉ.जिवबा रामचंद्र केळुसकर यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करत “प्रत्येकाने मराठी बोलले पाहिजे; मला मराठीने खूप काही दिले,” असे सांगितले. मराठी ही केवळ व्यवहाराची भाषा नसून ती संस्कार,विचार आणि आत्मसन्मान जपणारी मातृभाषा आहे असे ते म्हणाले. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याचा फायदा मला जीवनात झाल्याचं त्यांनी सांगत लहान मुलांची मराठीत बोलले पाहिजे,घराघरात त्यांना संस्कृत श्लोक शिकवले पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

कवयित्री व लेखिका,संपादिका सौ.अनघा राणे यांनी मराठी भाषेमुळे आपण संस्कार,परंपरा आणि आपुलकीची नाळ जपत आलो आहोत असे सांगितले. भाषेमुळे समाजात परस्पर सहकार्य, बंधुभाव आणि सांस्कृतिक ऐक्य वृद्धिंगत होते असे त्यांनी नमूद केले.

भारतीय जनता पार्टीचे भायखळा येथील नगरसेवक रोहिदास लोखंडे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करत केंद्र शासन व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. मराठी भाषेच्या समृद्ध इतिहासाला मिळालेला हा सन्मान संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात मान्यवरांनी मराठी भाषेचा गौरव,तिची समृद्ध संस्कृती,प्रतिष्ठा, परंपरा आणि आधुनिक युगातील महत्त्व अधोरेखित केले.या कवी संमेलनात अनेक कवी व कवयित्रींनी सहभाग घेतला कवी अशोक सुकाळे, सौ विद्या डोंबे, ॲड.सोपान बुडबाडकर,सौ सोनाली जगताप,सौ गीतांजली वाणी, श्रीमती गीताश्री नाईक, सौ सुनीता काटकर, श्री अशोक पुंडलिक उर्फ भाई नार्वेकर, सु. ना सरपडवळ, डॉक्टर शैलजा करोडे, प्रभू अग्रहारकर,डॉ. रेवती आळवे,डॉ. खं रा माळवे, ॲड. बाळासाहेब तोरस्कर, बबन येरम,यासह अनेकांनी कविता सादर केली, जागतिकीकरणाच्या युगात विविध भाषांचा स्वीकार करतानाच मातृभाषेचे जतन आणि संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. मराठी भाषेतील शब्दसंपदा, साहित्यवैभव,संत परंपरा, समाजसुधारकांचे विचार आणि आधुनिक पत्रकार,कवी,लेखक योगदान यामुळे मराठी ही संस्कारी,शौर्य निर्माण करणारी भाषा असल्याचे अधोरेखित करण्यात आले. विविध कवींच्या प्रभावी कविता, शेरोशायरी आणि भावगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले,मराठी भाषेच्या माधुर्याचा आणि अभिव्यक्तीच्या सामर्थ्याचा अनुभव या कार्यक्रमातून सर्वांना मिळाला.

संघटनेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणी व सल्लागारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले,कवी संमेलनात सहभागी झालेल्या कवींचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मानचिन्ह, सन्मानपत्र,शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्ष प्रकाश पाटकर, उपाध्यक्ष सुनील शिर्के, सचिव अशोक विठ्ठल भोसले आणि सहसचिव शशिकांत सावंत यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. सदर कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार,कृष्णा काजरोळकर (सल्लागार), गुरुनाथ तिरपणकर (सल्लागार), जगन्नाथ कामत( सल्लागार), छाया गचके(खजिनदार), डॉ.सूर्यभान डोंगरे (संयुक्त कार्यवाह),आप्पासाहेब जगदाळे (कार्यकारिणी सदस्य), (आण्णासाहेब आहेर (कार्यकारिणी सदस्य)अशोक लांडगे (कार्यकारणी सदस्य),रवी नानचे (कार्यकारणी सदस्य) यासह अनेक सदस्य व व्यक्तिमत्त्वांचा सहयोग कार्यक्रमाला लाभला,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा काळे यांनी प्रभावीपणे केले, कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या खजिनदार श्रीमती छाया गचके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. मराठी भाषा दिनानिमित्त पार पडलेला हा काव्यमय सोहळा मराठी भाषेचा अभिमान जागवणारा,तिच्या वैभवशाली परंपरेची जाणीव करून देणारा आणि नव्या पिढीला मातृभाषेच्या जतन-संवर्धनासाठी प्रेरणा देणारा ठरला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'तेजस्वी'मधून उलगडली सावरकरांची स्फूर्तिदायी गाथा

■ वंचित विकास संस्थेतर्फे आयोजन; दुर्मिळ छायाचित्रे, रचना व कथेतून पुणेकरांना दृकश्राव्य अनुभूती

पुणे (दैनिक संध्या) : पडद्यावर दिसणारी दुर्मिळ छायाचित्रे, त्याला पूरक निवेदन, अजरामर रचना आणि कथनातून साकारलेल्या 'तेजस्वी' या कार्यक्रमात पुणेकरांना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्फूर्तिदायी गाथेची दृकश्राव्य अनुभूती मिळाली. 'जय देव जय देव जय शिवराया', 'सागरा प्राण तळमळला', 'हे हिंदू नृसिंहा' अशा अजरामर गीतांनी उपस्थितांना भावविवश केले. निमित्त होते, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त वंचित विकास संस्थेतर्फे आयोजित 'तेजस्वी' या सांगीतिक कार्यक्रमाचे! टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई सभागृहात झालेल्या कार्यक्रमात सावरकरांच्या अष्टपैलू जीवनाचा पट उलगडत गेला. प्रखर राष्ट्रभक्त, क्रांतिकारकांचे मुकुटमणी, प्रतिभावान लेखक, संवेदनशील कवी, विद्वान व्याख्याते, उत्कृष्ट नाटककार, कठोर विज्ञाननिष्ठ, भाषाप्रेमी, समाजसुधारक, हिंदू संघटनासाठी नाविन्यपूर्ण संकल्पना राबवणारे कृतिशील हिंदुत्ववादी असे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विविध पैलू समोर आले. राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. संस्थेच्या वतीने त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाची निर्मिती, संकल्पना आणि लेखन सुधांशु नाईक यांनी केले होते. प्रसाद नातू, आरती परांजपे, चैत्राली अभ्यंकर आणि स्वतः सुधांशु नाईक यांचे ओघवते सादरीकरण मंत्रमुग्ध करणारे होते.

## 'आरबीआय'च्या नियामक आराखड्याच्या केंद्रस्थानी ठेवीदारांचेच हित

सतीश मराठे यांचे प्रतिपादन; 'आयएमडीआर'तर्फे 'भारतामधील ठेवीदारांचा आवाज आणि बँक प्रशासन' यावर चर्चासत्र

**पुणे (दै. संध्या) :**



"ठेवीदार संरक्षण हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) नियामक आणि पर्यवेक्षीय चौकटीच्या केंद्रस्थानी आहे. ठेवीदारांना बँकेच्या संचालक मंडळावर थेट प्रतिनिधित्व नसले, तरी संपूर्ण नियामक रचना ही ठेवीदारांच्या हितांचे संरक्षण आणि वित्तीय स्थैर्य सुनिश्चित करण्यासाठी उभारण्यात आलेली आहे," असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय मंडळाचे संचालक सतीश मराठे यांनी केले. डेक्कन एज्युकेशन संचालित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्चच्या (आयएमडीआर) वतीने 'भारतामधील ठेवीदारांचा आवाज आणि बँक प्रशासन' या विषयावर आयोजित संशोधन आधारित परिसंवादात सतीश मराठे बोलत होते. या परिसंवादामध्ये वरिष्ठ धोरणनिर्माते, बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक, व्यावसायिक तसेच विद्यार्थी यांनी भारतातील बँक प्रशासनाच्या विकसित होत असलेल्या रचनेवर सखोल चर्चा केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त विवेक मठकरी, माजी विश्वस्त महेश आठवले, 'आयएमडीआर'च्या संचालिका डॉ. शिखा जैन, माजी विद्यार्थिनी, अल्युमिना कन्सल्टिंगच्या संस्थापक-संचालिका अंजली पाटील आदी उपस्थित होते.

सतीश मराठे यांनी भारतातील तसेच जागतिक पातळीवरील ठेवीदार संरक्षणाच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेतला. स्वातंत्र्योत्तर काळात ठेवी विमा व्यवस्थेची स्थापना कशी झाली, यावर त्यांनी प्रकाश टाकला. भारतात आज लहान ठेवी खात्यांपैकी जवळपास सर्व खाती ठेवी विमा संरक्षणाखाली येतात, ज्यामुळे जागतिक निकषांशी सुसंगती राखली जाते आणि बँकिंग व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो, असे त्यांनी सांगितले. बँकांनी सावधगिरी आणि नियंत्रित जोखीम स्वीकृती यांचा समतोल साधणे आवश्यक असते; अन्यथा कर्जपुरवठा आणि आर्थिक विकासावर परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

बँकिंग क्षेत्रासमोरील उदयोन्मुख आव्हानांवर बोलताना ठेवीदारांचे स्वरूप बदलत असून, ते आता गुंतवणूकदार बनत आहेत. जोखीम व्यवस्थापन अधिक गतिमान करण्याची गरज आहे. तसेच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा विश्लेषण यांची नियामक देखरेखीत भूमिका वाढली आहे. व्यवस्थापन मंडळावर ठेवीदारांना स्थान मिळण्याची शक्यता अत्यल्प आहे. लाखो ठेवीदारांमधून खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती निवडणे हे संस्थात्मकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे आहे. तसेच ठेवीदार थेट मंडळावर आल्यास निर्णयप्रक्रियेत अति-जोखीम टाळण्याची प्रवृत्ती वाढू शकते, अशी त्यांनी सूचना केली.

'इंदिरा अनंत आठवले स्मृती संशोधन निधी'अंतर्गत प्रा. दर्शन बागडे यांच्या संशोधनावर आधारित हा परिसंवाद घेण्यात आला. डॉ. शिखा जैन आणि प्रा. हृषिकेश खळदकर यांनी या संशोधनाला सहकार्य केले. संशोधन निधीचे प्रवर्तक महेश आठवले यांनी समाजाभिमुख आणि धोरणाधारित संशोधनाला प्रोत्साहन देणे हा या निधीचा उद्देश असून, शैक्षणिक संस्थांनी प्रत्यक्ष धोरणात्मक प्रश्नांवर संशोधन करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

## अर्थसंकल्पाबाबत AMCCIE कडून ठाम व आक्रमक भूमिका

**पुणे (दै. संध्या) :**



अग्रवाल मारवाडी वाणिज्य, उद्योग व शिक्षण मंडळाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आगामी अर्थसंकल्पाबाबत ठोस, परिणामकारक व वेळबद्ध सुधारणांची जोरदार मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र हा देशाचा आर्थिक व औद्योगिक कणा असल्यामुळे केवळ घोषणांवर न थांबता ठोस धोरणात्मक निर्णय घेणे अत्यावश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, “महाराष्ट्राला टप्प्याटप्प्याने नव्हे तर वेगवान आर्थिक गतीची गरज आहे. उद्योग व गुंतवणूकदारांना ठोस निर्णयांची अपेक्षा आहे.”

राष्ट्रीय उपाध्यक्ष नरेंद्र गोयल यांनी राज्यभर मुद्रांक शुल्क एकसमान दोन टक्के करण्यात यावे, अशी मागणी केली. सध्याचे उच्च दर स्थावर मालमत्ता व्यवहारांना अडथळा ठरत असून पारदर्शक व्यवहारांना चालना देण्यासाठी दरकपात आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महासचिव उमेश मांडोत यांनी उद्योगांना परवानग्या देण्यासाठी खऱ्या अर्थाने एकखिडकी मंजुरी पद्धती लागू करावी, अशी मागणी केली. कायदेशीर वेळमर्यादा निश्चित करून विलंब करणाऱ्या विभागांवर जबाबदारी निश्चित करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. संघटन मंत्री कमलराज बंसल यांनी उद्योगांना चोवीस तास अखंड व स्पर्धात्मक दरात वीजपुरवठा देणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. इतर औद्योगिक राज्यांच्या तुलनेत वीजदर स्पर्धात्मक नसल्यास उद्योगांचे स्थलांतर होण्याचा धोका असल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय सल्लागार भीमसेन अग्रवाल यांनी लघु, सूक्ष्म व मध्यम उद्योगांसाठी सुलभ व सुसंगत अनुपालन व्यवस्था, व्याज अनुदान व आर्थिक प्रोत्साहने देण्याची मागणी केली.

## पुणे जिल्हा परिषदेच्या ३,००० विद्यार्थ्यांचा विज्ञानाचा 'महासंगम'; आयुका आणि आयसरमध्ये ऐतिहासिक सहभाग

**नाझरे सुपे (दै. संध्या) :**



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी 'पुणे मॉडेल' सज्ज; इस्रो आणि नासा भेटीचे वेध राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पुणे जिल्हा परिषद आणि शहरातील प्रमुख वैज्ञानिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाचे एक नवे दालन खुले झाले. जिल्ह्यातील ५० हून अधिक शाळांमधील ३,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी 'इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स'(आयुका) आणि 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च' (आयसर) पुणे येथे आयोजित कार्यक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवत विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

आयुकामध्ये १,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी 'ओपन डे'चा आनंद लुटला. यावेळी विद्यार्थ्यांनी: लिगो (गुरुत्वीय लहरी), अर्थ पेंडुलम आणि इस्रोच्या विविध मोहिमांचे मॉडेल्स पाहून अत्याधुनिक संशोधनाची माहिती घेतली. व्याख्याने, वैज्ञानिक प्रात्यक्षिके आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून अवकाशातील गुपिते उलगडली. कार्यक्रमाचा समारोप सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या भव्य आकाश निरीक्षण (स्टार गेझिंग) सत्राने झाला.यावेळी आयुका चे संचालक प्रा. श्री.आनंद यांनी जिल्हा परिषदेसोबतच्या सामंजस्य कराराचा उल्लेख करत, भविष्यात ग्रामीण शाळांसोबतचे हे सहकार्य अधिक घट्ट करण्याचा पुनरुच्चार केला.

आयसर पुणे: 'विकसित भारत' आणि विज्ञानातील महिला विज्ञानातील महिला: विकसित भारत उत्प्रेरक आयसर पुणे येथे विज्ञानातील महिला: विकसित भारत उत्प्रेरक या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय कार्यक्रम पार पडला. येथे २,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधला. विशेष आकर्षण: पद्मश्री अरविंद गुप्ता यांचे "छोटी खेळणी - मोठे विज्ञान" हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले. साध्या टाकाऊ वस्तूंपासून विज्ञान कसे शिकता येते, याचे धडे त्यांनी दिले. यशस्वी शाळा: ५० शाळांपैकी झेडपी शाळा कोरेगाव बुद्रुक ((विज्ञान आणि गेमिंग) ) आणि झेडपी शाळा बोतरवाडी (वायू प्रदूषण कसे कमी करावे) या दोन शाळांच्या प्रकल्पांची अंतिम स्टेम प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी प्रशासनाची ठाम भूमिका मांडली. ते म्हणाले, "जिल्हा परिषद शाळांमध्ये आधुनिक विज्ञान आणि खगोलशास्त्र प्रयोगशाळा उभारण्यावर आमचा भर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक संधी मिळवून देण्यासाठी आम्ही इस्रो आणि नासा सारख्या संस्थांच्या भेटींचे आयोजन करणार आहोत."

जिल्हा शिक्षण अधिकारी भाऊसाहेब कारेकर आणि संजय नाईकडे यांनी आगामी वर्षाची रूपरेषा मांडताना सांगितले की, पारदर्शक निवड प्रक्रियेद्वारे (परीक्षा व मुलाखत) गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना एनडीए, जीएमआरटी, आयुका आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ संस्थांच्या भेटीसाठी पाठवले जाईल. ग्रामीण व शहरी शिक्षणातील दरी कमी करणे हाच या 'पुणे मॉडेल स्कूल' संकल्पनेचा गाभा असल्याचे सिद्धार्थ चव्हाण यांनी स्पष्ट केले.

## शेती व्यवस्थापन कार्यशाळा : शेतकऱ्यांसाठी एक क्रांतिकारी पाऊल

**पुरंदर (दै. संध्या) :**

पुण्याजवळील सासवड येथील नायगाव परिसरात नुकतीच तीन दिवसीय शेती व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत रुजुजा कल्पना भगवान शिंदे (BSc मायक्रोबायोलॉजी विद्यार्थीनी) तसेच Modern College of Arts, Science and Commerce, Shivajinagar येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेत शेतीच्या विविध पैलूंवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये शेती ही केवळ बी पेरण्याची प्रक्रिया नसून संपूर्ण नियोजनावर आधारित व्यवस्थापन आहे, यावर विशेष भर देण्यात आला. जमिनीची पूर्वतयारी, सेंद्रिय खतांचा वापर, हवामानानुसार पिकांची निवड आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तज्ज्ञांनी पावसाळ्यापूर्वी जमीन नांगरून सेंद्रिय खतांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होते, असे सांगितले. सासवड परिसरात डाळिंब, कांदा, भाजीपाला तसेच नायगाव भागात सीताफळ यांसारखी पिके चांगली येतात, अशी माहिती देण्यात आली. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर हायब्रिड बियाण्यांचा वापर करण्याचाही सल्ला देण्यात आला.

ठिबक सिंचन पद्धतीमुळे पाण्याची बचत होऊन उत्पादनात वाढ होते, असे सांगण्यात आले. रासायनिक खतांचा अतिरेक टाळून सेंद्रिय खतांचे मिश्रण वापरणे गरजेचे असल्याचेही तज्ज्ञांनी नमूद केले.

खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामातील पेरणी व कापणीचे वेळापत्रक स्पष्ट करण्यात आले. वेळेवर कामे न केल्यास नुकसान होऊ शकते, याची जाणीव शेतकऱ्यांना करून देण्यात आली.

शेतीसाठी आवश्यक भांडवल उभारणीबाबत विविध पर्याय सांगण्यात आले. पीक विमा योजना, किसान क्रेडिट कार्ड, नाबार्ड कर्ज योजना तसेच पंतप्रधान किसान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. स्वयंसहाय्य गटांच्या माध्यमातून सामूहिक कर्ज उपलब्ध होऊ शकते, अशी माहिती देण्यात आली. शेतीपूरक प्रक्रिया उद्योग, थेट विक्री, ॲग्रो-टुरिझम आणि सेंद्रिय शेतीद्वारे उत्पन्न वाढवता येते, यावर कार्यशाळेत भर देण्यात आला. आधुनिक ॲप्स आणि तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतकऱ्यांना बाजारभावाची माहिती मिळून अधिक नफा मिळू शकतो, असे सांगण्यात आले.

कार्यशाळेच्या अनुभवाबद्दल बोलताना रुजुजा शिंदे यांनी सांगितले की, “या तीन दिवसांत आम्हाला शेती व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष आणि उपयुक्त ज्ञान मिळाले. मी घेतलेल्या नोंदींच्या आधारे गावातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहे.”

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सासवड येथील सर्व शिक्षक व तज्ज्ञांचे सहभागी विद्यार्थ्यांनी मनापासून आभार मानले. शेती व्यवस्थापनाच्या योग्य पद्धती आत्मसात केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून शेती अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही १) श्रीमती. चंद्रभागा रविंद्र बनसोडे २) श्री. अमित रविंद्र बनसोडे, ३) श्री. अभिजित रविंद्र बनसोडे, सर्व रा. मु. परीटवाडी, ओझर, ता. जुन्नर, जि. पुणे, पिन कोड - ४१०५०४. यांचे मालकी हक्क व ताबे-वहिवाटीची असून, त्याप्रमाणे त्यांचे नावाची नोंद सदर मिळकतीचे ७/१२ सदरी फेरफार नोंद क. १६१५ अन्वये मालकीहक्काने कब्जेदार सदरी दाखल आहेत. सदरील मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिलांचे दरम्यान सदर मिळकतीच्या विक्री-व्यवहाराबाबत बोलणी, चर्चा व वाटाघाटी होवून व्यवहार निश्चीत झाला आहे. सदर मिळकतीचे मुळ मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विक्री करण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी, बोजारहीत व वादरहित असल्याची खात्री व भरवंसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. सदर मिळकतीचे मुळ मालकांनी भाग मोबदला स्विकारून सदर मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विक्री करण्याचे मान्य व कबुल केले आहे. तथापि सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काहीएक मालकी, हक्क, अधिकार, हितसंबंध, वाद, दावा, ताबे-वहिवाट, लीज, लीन, बक्षीसपत्र, करार, मदार, विसार पावती, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा काहीएक हक्क अधिकार व हितसंबंध असल्यास, अशा संबंधीत इसमांनी/व्यक्तींनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर, समक्ष भेटून लेखी कागदपत्रे व पुराव्यांसह खात्री पटवून दयावी, तसे 'न' केल्यास सदर मिळकतीचे विद्यमान मालकांस मिळकतीचे पूर्ण स्वामित्व आहे. असे गृहित धरून, आमचे अशिल मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्टः- तुकडी व जिल्हा पुणे, पोट तुकडी व तालुका जुन्नर, मे. सह-दुय्यम निबंधक, जुन्नर (पुणे), यांचे कार्यक्षेत्रातील, तसेच जिल्हा परिषद पुणे व तालुका पंचायत समिती जुन्नर, यांचे हद्दीतील, ग्रामपंचायत, मुलकी गाव मौजे - धामणखेल, येथील जमीन यांसी गट नं. ५८२/३/अ, यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर, ८१ आर, यांसी आकार रक्कम रूपये ०१.५६ पैसे, पैकी लिहुन देणार यांचे मालकी हक्क व ताबे-वहिवाटीचे ०० हे. २३ आर यांसी आकार रक्कम रूपये ००.४६ पैसे, ही संपुर्ण मिळकत यांसी चतूःसीमा येणेप्रमाणे; पुर्वेसः गट नं. ५४६, दक्षिणेसः गट नं. ५८२/४, पश्चिमेसः गट नं. ५८०, उत्तरेसः गट नं. ५८२/३ पैकी.

जुन्नर (पुणे),
दिनांक: २८/०२/२०२६.

सही/-
श्री. प्रतिक बी. मेहेर,
ऑफीसः शॉप नं. एस-६, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, व्यापारी संकुल, धान्य बाजार, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे,
पिन कोड - ४१०५०२.
मो. नं.: ७२१९३७०८३७.

# राजकीय पुर्नवसनासाठी 'स्वीकृत' सौदेबाजी?



या पार्श्वभूमीवर, खऱ्या कार्यकर्त्यांना न्याय मिळणार की पुन्हा एकदा 'गंदा है पर धंदा है'.... चा प्रयोग होणार, असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे. स्वीकृत नगरसेवक म्हणून खऱ्या अर्थाने अभ्यासू व्यक्ती सभागृहात आल्यास त्याचा शहरासाठी निश्चितपणे लाभ होऊ शकतो. मात्र, राजकीय सेटलमेंटसाठी त्याचा सर्रास वापर होताना दिसतो. स्वीकृत नगरसेवकपद हे एकप्रकारे सत्तेच्या गाभाऱ्यातील प्रवेशद्वार आहे. ते दार निष्ठावंत कार्यकर्त्यांसाठी तसेच नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांकरिता राबणाऱ्यांसाठी उघडले पाहिजे. पैशांच्या जोरावर पदे लाटणाऱ्यांसाठी ते उघडले जाऊ नये.

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकांची निवड प्रक्रिया आता निर्णायक टप्प्यात आली असल्याने त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नव्या रचनेनुसार पालिकेतील स्वीकृत नगरसेवकांची संख्या पाच वरून १० पर्यंत वाढली आहे. सध्याच्या पक्षीय बलानुसार १२८ पैकी ८४ जागा जिंकणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या वाटणीला सात आणि ३७ जागा जिंकणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला (अजितदादा गट) तीन स्वीकृत नगरसेवक मिळणार आहेत. पालिकेच्या एकूण नगरसेवकांची संख्याही १३८ पर्यंत वाढणार आहे. वास्तविक पाहता, विविध क्षेत्रातील तज्ञ, अभ्यासू व कार्यतत्पर व्यक्तींना सामावून घेण्यासाठी स्वीकृत नगरसेवक ही संकल्पना आहे. प्रत्यक्षात, याचा वापर प्रामुख्याने राजकीय कार्यकर्त्यांचे पुर्नवसन करणे, यासाठीच केला जातो.

भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस, अशा दोन्हीही प्रमुख राजकीय पक्षांमध्ये इच्छुक कार्यकर्त्यांची संख्या खूपच जास्त आहे. स्वीकृतची संधी मिळावी, यासाठी शक्य त्या सर्व मार्गांचा अवलंब करत इच्छुकांनी आपापल्या शीर्षस्थ नेत्यांकडे जोरदार फिल्डींग लावली आहे. पक्षाची अधिकृत उमेदवारी ज्यांना मिळाली नाही, असे इच्छुक सर्वाधिक आहेत. याशिवाय, तिकीट मिळूनही ज्यांना पराभव पत्करावा लागला, त्यांनाही स्वीकृतपदाची आस आहे. निवडणूक काळात ज्यांनी चांगली कामगिरी बजावली, पक्षाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यात ज्यांनी महत्त्वाचे योगदान दिले, त्यांनाही या संधीची अपेक्षा आहे. ज्या प्रभागात प्रतिस्पर्धी पक्षाचे सगळेच उमेदवार निवडून आले आहेत, अशा प्रभागांमध्ये स्वपक्षीय अस्तित्व राखण्यासाठी स्वीकृत नगरसेवकपद मिळावे, अशी भूमिका काहींनी मांडली आहे. एकीकडे कार्यकर्त्यांकडून असे युक्तीवाद केले जात असले तरी, निवडणुकीच्या गरमागरमीत नेतेमंडळींनी अनेकांना 'तुला कॉप (स्वीकृत) करून घेऊ' असा शब्द दिलेला आहे आणि तो कळीचा मुद्दा आहे. बंडखोरी टाळण्यासाठी म्हणा किंवा

## निष्ठेला न्याय, कार्याला वाव की, नेत्यांचा डाव अन् कोट्यवधींचा भाव..!

आपल्या हक्काच्या उमेदवाराच्या वाटेतील अडथळा दूर करण्यासाठी म्हणा...मागचा-पुढचा विचार न करता स्वीकृतचे गाजर दाखवत तेव्हा वेळ मारून नेण्यात आली. आता तो शब्द पाळण्याची वेळ आली आहे. प्रत्यक्षात परिस्थिती अशी आहे की, उपलब्ध जागांची संख्या खूपच कमी आहे आणि इच्छुकांची संख्या बरीच मोठी आहे. अशा परिस्थितीत, स्वीकृतच्या मुद्द्यावरून कार्यकर्त्यांच्या रोषाला सामोरे जावेच लागणार आहे. कारण, स्थानिक नेत्यांची सर्वोच्च प्राधान्यक्रम असणारी यादी वेगळीच आहे आणि त्याचे निकषही अर्थपूर्ण आहेत. त्यात निष्ठावंत तथा हाडाचे कार्यकर्ते कितपत असतील, याविषयी साशंकता आहे.

भाजपमध्ये स्थानिक पातळीवर विचार होणार नसेल तर मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांच्या स्तरावरून तरी खऱ्या कार्यकर्त्यांना न्याय मिळेल, आपल्या आतापर्यंतच्या कार्याची नोंद घेतली जाईल, संघटनेसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांची शिफारस केली जाईल, असा विश्वास भाजप कार्यकर्त्यांना अजूनही वाटतो. राष्ट्रवादीत मात्र, अजितदादांच्या पश्चात नेमका अंतिम निर्णय कोण घेणार, याविषयी तर्कवितर्क आहेत.

भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी यासंदर्भात पक्षाची भूमिका अलिकडेच स्पष्ट केली आहे. त्यानुसार, ज्यांना पालिका निवडणुकीत उमेदवारी दिली होती, त्यांचा स्वीकृतसाठी विचार होणार नाही. आमदार-खासदारांच्या मुलांना स्वीकृत नगरसेवकपद दिले जाणार नाही. या पदासाठी पूर्वी पाच वर्षांचा कालावधी होता. तो यापुढे फक्त अडीच वर्षांचाच राहील. जेणेकरून अधिकाधिक कार्यकर्त्यांना नगरसेवक पदावर काम करण्याची संधी देता येऊ शकेल. भाजपमध्ये संघटनात्मक पातळीवर काम करणाऱ्या किंबहुना पक्षातील जुन्या व निष्ठावान कार्यकर्त्यांना तिकीटे नाकारण्यात आली. जुन्यांपैकी ज्यांना तिकीटे मिळाली, त्यांच्याबाबतीत पाडापाडीचे राजकारण झाले. भाजपचे नगरसेवक झालेले बहुतांश कार्यकर्ते दुसऱ्या पक्षातून आलेले आहेत. बदलते राजकीय वारे लक्षात घेऊन त्यांनी पक्षांतर केले. अशांना लगेचच उमेदवारी बहाल करण्यात आली. भाजपकडून ते निवडून येताच त्यांना मोठी पदे देण्यात आली. सर्वात जुने म्हणता येईल असे, महेश कुलकर्णी यांना पुन्हा नकारघंटा मिळाली. चिंचवडमधून ब्राम्हण समाजाला उमेदवारी द्या, अशी आग्रही मागणी कुलकर्णी गेल्या अनेक वर्षांपासून करत आहेत. याविषयी पाठपुरावा करताना त्यांनी आकाश-पाताळ एक केले. त्यांच्या या प्रयत्नांचे यश म्हणा की दुसरे काही....चिंचवडमधून एक जागा ब्राम्हण समाजाला सोडण्यात आली. परंतू, महेश कुलकर्णी यांना तिकीट न देता शेजारच्या प्रभागात मंदार देशपांडे यांना देण्यात आले. जुन्यांपैकी उमेदवारी मिळाली नाही, असे कुलकर्णी एकटेच नव्हते. माजी उपमहापौर केशव घोळवे, माजी नगरसेवक राजू दुर्गे, माऊली थोरात, संघटन सरचिटणीस अमोल थोरात अशी बरीच नावे आहेत. माजी शहराध्यक्ष सदाशिव खाडे यांनी पत्नीसाठी, माजी शहराध्यक्ष एकनाथ पवार यांनी मुलीसाठी, माजी गटनेते अशोक सोनवणे यांनी सुनेसाठी, माजी संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांनी पत्नीसाठी, अजय पाताडे यांनी मुलीसाठी प्रयत्न केले. इतरही अनेकांनी उमेदवारी मागून पाहिली. मात्र, कोणालाही यश आले नाही. दुर्गे यांची मुलगी तेजस्विनी गेल्यावेळी आकुर्डी-काळभोरनगरच्या प्रभागातून थोड्याच मतांनी पराभूत झाली होती. तरीही तिच्या नावाचा विचार झाला नाही.नव्या सांगवीत भाजपकडून एकाच जगताप परिवारात तीन जणांना उमेदवारी देण्यात आली. मात्र बाराही महिने राबणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलण्यात आले. कासारवाडी-संत तुकारामनगर प्रभागातून कुणाल लांडगे यांची उमेदवारी निश्चित मानली जात होती. त्यादृष्टीने लांडगे यांनी जोरदार तयारी सुरू केली होती. कडवी लढत होईल, अशी स्पष्ट चिन्हे होती. मात्र, मोक्याच्या क्षणी त्यांना थांबवण्यात आले. अन्य कोणत्याही ताकतीच्या कार्यकर्त्याला इच्छा असूनही लढू दिले नाही. पडद्यामागे असे नेमके काय घडले, कोणाच्या फायद्यासाठी आणि का...हा निर्णय घेतला गेला, याचे गूढ आहे. या पॅनेलमधूल भाजपचा एकही नगरसेवक निवडून येऊ शकला नाही. मात्र, राष्ट्रवादीचे चारही उमेदवार नगरसेवक झाले. आकुर्डी प्रभागातही भाजपचा एकच नगरसेवक निवडून येऊ शकला. (त्यातही फिक्सींग होतेच) या उद्योगांमुळे भाजपचे राजकीयदृष्ट्या नुकसान झाले. अशाच प्रकारे स्थानिक नेत्यांमध्ये पक्षीय राजकारण बाजूला ठेवून स्वार्थासाठी ठिकठिकाणी राजकीय तथा आर्थिक 'सेटलमेंट' झाल्या. परिणामी इतर अनेक प्रभागांमध्येही असेच उलटे- पालटे निकाल लागले.

### तिकीटांचे 'रेट कार्ड'

पिंपरी-चिंचवड शहरभरात पालिका निवडणुकीच्या तिकीटवाटपात अनेक ठिकाणी आतबट्ट्याचे व्यवहार झाल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. तिकीटासाठी कोणी जमीन-जुमला दिला, कोणी व्यवसायात भागीदारी दिली. कोणी रोखीत व्यवहार केला. अशा इतरही कथित व्यवहारांचे किस्से आणि सुरस कथा राजकीय वर्तुळातून ऐकायला मिळत आहेत. याविषयी अधिकृत तक्रारी होत नसल्या तरी सार्वजनिकपणे होणारे विषय हीच बाब गंभीर तितकीच धोकादायक आहे. आता स्वीकृत नगरसेवक पदासाठी तोच धंदेवाईक कित्ता पुन्हा गिरवला जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जे उमेदवार ठरवले जातील, त्यांचे नेमके निकष काय असतील. केवळ स्थानिक नेत्यांच्या जवळचा आहे, या पात्रतेवरच नावे ठरवली जातील किंवा 'मोठ्ठा' व्यवहार होईल, त्यांचीच वर्णी लागेल, अशी भीती इच्छुकांना आहे. इरेला पेटलेले काही इच्छुक पाच कोटी रूपयांपर्यंत 'डील'च्या तयारीत आहेत. इतरही आकर्षक 'ऑफर' देखील दिल्या जात आहेत. स्वीकृतसाठी देखील तशाच पध्दतीचे 'रेट कार्ड' लागू असल्याची चर्चा होऊ लागली आहे.


## थोडक्यात पण महत्वाचे...



### आप्पासाहेब काळोखे यांचा 'यमूनानगर भूषण" पुरस्काराने सन्मान

पिंपरी (दैनिक संध्या) : राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानच्या वतीने जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व देहू नगरपंचायतीचे माजी सभापती गोपाळ उर्फ आप्पासाहेब काळोखे यांना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते 'यमूनानगर भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच नवनिर्वाचित नगरसेविका सुलभा उबाळे, नगरसेवक उत्तम केंदळे, बापू घोलप, अर्चना कारंडे यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन उद्योजक विजयकुमार जयशेट्टे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, हवेली पंचायत समितीचे सदस्य बाळासाहेब काळोखे, माजी नगरसेवक सचिन चिखले, राजाभाऊ गोलांडे, गणेश काळोखे, पांडुरंग काळोखे, भानूदास काळोखे, माजी प्राचार्य डॉ. सोमनाथ नजन, राहूल जाधव, ज्ञानेश्वर बिराजदार, विठ्ठल मंदिरचे अध्यक्ष अंकुश जगदाळे, नारायण पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र घोडके, उत्सव समितीचे अध्यक्ष रविंद्र चित्ते, उपाध्यक्ष दीपक वाणी, कार्याध्यक्ष दत्तात्रय मेमाणे, भरत डोके, दिगंबर पेटकर, गौरव सोनवणे, विश्वनाथ घोडके, सागर सुरवसे, उमेश कागे यांनी केले. प्रास्ताविक शोभा घोडके यांनी, सन्मानपत्राचे वाचन सुनिता सुर्यवंशी यांनी, सूत्रसंचालन दीपक मुगावे यांनी, तर आभार नरसिंग माने यांनी मानले.

### बनावट लिंकवर क्लिक; नागरिकाची 1 लाख 68 हजारांची फसवणूक




सांगवी (दैनिक संध्या) : ऑनलाईन ट्रॅफिक दंड भरण्याच्या नावाखाली आलेल्या बनावट मेसेजमुळे पिंपळे निलख येथील एका नागरिकाची १ लाख ६८ हजार ४४२ रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीच्या मोबाईलवर "Compulsory Traffic Fine Reminder: Non-Compliance Will trigger license cancellation & further legal consequences. Settle immediately!" असा मजकूर असलेला मेसेज आला होता. त्यात एक लिंक देण्यात आली होती. त्या लिंकवर क्लिक केल्यावर ट्रॅफिक पोलिसांचा ५०० रुपयांचा दंड थकबाकी असल्याचे दर्शविण्यात आले. दंड भरण्यासाठी फिर्यादीने मोबाईलवरील 'प्रोसीड' बटणावर क्लिक करताच त्यांच्या खात्यातून ५०० रुपयांऐवजी तब्बल १ लाख ६८ हजार ४४२ रुपये कट झाल्याचे आढळले. यानंतर त्यांनी तात्काळ पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. सांगवी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून संबंधित लिंक व मोबाईल क्रमांकाचा मागोवा घेतला जात आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या अनोळखी लिंकवर क्लिक करू नये तसेच अधिकृत संकेतस्थळावरूनच कोणतेही ऑनलाईन व्यवहार करावेत, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी अभिषेक बारणे यांची निवड

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी आज पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे स्थायी समितीची विशेष सभा पार पडली. सदर विशेष सभेत स्थायी समिती सभापती पदासाठीची निवडणूक प्रक्रिया पार पडली. स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन अर्जांची छाननी करण्यात आली असता अभिषेक बारणे यांचा एकमेव अर्ज वैध ठरला. इतर कोणताही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे अभिषेक बारणे यांची स्थायी समिती सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी एम.जे. प्रदीप चंद्रन यांनी जाहीर केले. निवडणूक कार्यालयास आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त



तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप,मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविणकुमार जैन, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, विशेष अधिकारी किरण गायकवाड तसेच महापालिका विविध विभागप्रमुख उपस्थित होते,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले. या निवडीनंतर महापौर रवि लांडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह नगरसदस्य व नगरसदस्या यांनी सभापती अभिषेक बारणे यांचे अभिनंदन केले.

## बोगस पदवीद्वारे पदोन्नती घेणाऱ्यांची विशेष समितीकडून होणार चौकशी

### आमदार अमित गोरखे यांच्या प्रश्नानंतर समिती गठीत

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्या आणि बोगस व दुरस्त शिक्षणाचा (Distance Education) आधार घेऊन नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती मिळवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत राज्य शासनाने चौकशी समिती गठीत केली असून, महापालिकेला पुढील तीन महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला. महापालिकेच्या विविध विभागांत अनेक कर्मचाऱ्यांनी युजीसीच्या (UGC) निकषांचे उल्लंघन करून मिळवलेल्या पदव्यांच्या आधारे वरिष्ठ पदे लाटल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे पात्र आणि प्रामाणिक कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. परराज्यातील पदव्या: अनेक कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांतून घेतलेल्या पदव्यांची वैधता संशयास्पद आहे. काही तांत्रिक पदांसाठी दुरस्त शिक्षणाद्वारे घेतलेल्या पदव्या ग्राह्य नसतानाही त्या पदोन्नतीसाठी वापरल्या गेल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. सेवा प्रवेश नियमावलीला बगल देऊन या पदोन्नत्या कशा देण्यात आल्या, याची सखोल चौकशी ही समिती करणार आहे. आमदार अमित गोरखे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि नियमांचे




उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे हे शासनाचे प्राधान्य आहे. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने या संपूर्ण प्रकरणाचा तपास करून येत्या ९० दिवसांच्या (३ महिने) आत आपला अंतिम अहवाल राज्य शासनाकडे सुपूर्द करावा, असे कडक आदेश त्यांनी दिले आहेत. शासनामार्फत या अहवालाची कसून तपासणी करून पुढील कार्यवाही निश्चित केली जाईल. या चर्चेत विधानपरिषदेचे ज्येष्ठ नेते आमदार प्रवीण दरेकर यांनी देखील सहभाग नोंदवला. त्यांनी या विषयाची व्याप्ती लक्षात घेता, केवळ एका महापालिकेपर्यंत मर्यादित न राहता राज्यस्तरावरील इतर महानगरपालिकांमध्येही अशाच प्रकारे नियमबाह्य पदोन्नती मिळवल्या जाण्याची शक्यता उपस्थित केली.

भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासनाने 'प्रतिबंधात्मक उपाययोजना' राबवणे अत्यंत आवश्यक आहे, असा महत्वाचा मुद्दा त्यांनी मांडला.

# पिंपरी-चिंचवडच्या वीज सक्षमीकरणाला "बुस्टर"

### राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आश्वासन; आमदार महेश लांडगे यांची लक्षवेधी


पिंपरी-चिंचवडमधील वाढत्या शहरीकरणाचा विचार करुन वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर पुरवण्याचे आणि महावितरणच्या विविध शाखा कार्यालय देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच झाले आहे. चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर विकसित झाला. तसेच, पुनावळे-रावेत- किवळे- वाकड हा रेसिडेन्सिअल कॉरिडॉर वाढतो आहे. दोन्ही कॉरिडॉरमध्ये इलेक्ट्रिक इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजींच्या नेतृत्वात भाजपा महायुती सरकारने ठोस निर्णय घेतले आणि कामही सुरू केले आहे. प्रस्तावित कामांना मंजुरी आणि निधीची उपलब्धता करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल मुख्यमंत्री साहेब आणि राज्य शासनाचे आभार मानतो. **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवडसह भोसरी विधानसभा मतदारसंघातील वाढत्या औद्योगिक व निवासी वीज समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र शासन सकारात्मक आहे. नवीन प्रस्तावित विकासकामे आणि पायाभूत प्रकल्पांसाठी आवश्यक निधीची पूर्तता करण्यात येईल. तसेच, वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी दिले.

महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने नियम १०५ अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहरातील वीज पुरवठा सक्षमीकरणाच्या अनुशंगाने विविध मागण्याची लक्षवेधी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात मांडली. त्याला मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांनी लेखी उत्तर दिले आणि वीज यंत्रणा अधिक सक्षम





करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्याचे संकेत दिले.

गणेशखिंड शहर मंडळांतर्गत भोसरी, चहोली, मोशी, तळवडे, चिखली आदी भागांमध्ये सध्या औद्योगिक, व्यावसायिक व निवासी अशा एकूण ४,५३,८२० ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. यामध्ये ५८० उच्चदाब ग्राहक आहेत. महापारेषणच्या चार २२० के.व्ही. उपकेंद्रांद्वारे भोसरी आर एस-१ (२७५ एम.व्ही.ए.), भोसरी आर एस-२ (१५० एम.व्ही.ए.), टेल्को (१५० एम.व्ही.ए.), चिंचवड आर एस (२३० एम.व्ही.ए.) : एकूण ८०५ एम.व्ही.ए. स्थापित क्षमता उपलब्ध असून सध्याची मागणी ६२७ एम.व्ही.ए. पर्यंत पोहोचली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे भविष्यातील ताण लक्षात घेता अतिरिक्त पायाभूत सुविधा उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. २०० केव्ही मोशी आणि २०० केव्ही चऱ्होली येथे उपकेंद्र तयार केली आणि प्रस्तावित सदरची कामे पूर्ण केल्यानंतर वीज समस्या सोडवण्यास मदत होईल, असेही बोर्डीकर- साकोरे यांनी म्हटले आहे.

ऊर्जा विभागाच्या माहितीनुसार पुढील प्रकल्पांना गती दिली जाणार आहे: सफारी पार्क, मोशी येथे अतिउच्चदाब (EHV) उपकेंद्र — मोशी, डुडुळगाव, आकुर्डी, चिखली, तळवडे परिसरातील वीजपुरवठा अधिक स्थिर होणार आहे. चहोली येथे नवीन EHV उपकेंद्र — भोसरी, चहोली, दिघी, धानोरी भागात पुरेशा दाबाने वीज उपलब्ध होणार आहे. सेंच्युरी इंका EHV उपकेंद्रात दोन नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याचा प्रस्ताव - भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी महत्वाचा टप्पा. मध्यम दाब स्विचिंग स्टेशनसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. भोसरी गावठाणातील ओव्हरहेड वीजवाहिन्या आरडीएसएस योजनेंतर्गत टप्प्याटप्प्याने भूमिगत करण्यात येणार आहेत. तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फीडर व भूमिगत केबल टाकण्याचे काम तातडीने हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे वारंवार होणारे वीजखंडित प्रकार कमी होतील. औद्योगिक उत्पादनात सातत्य राहील. निवासी भागात सुरक्षित आणि स्थिर वीजपुरवठा मिळेल. विशेष म्हणजे, वाढत्या शहरीकरणाचा विचार करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक असून संबंधित प्रस्तावांना प्राधान्याने मान्यता देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. कुदळवाडी परिसरात भारतातील सर्वात मोठी अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये सुमारे 900 एकर क्षेत्र रिकामे करण्यात आले. कुदळवाडीच्या जवळपास 5 हजार अवैध मिळकती होत्या. त्या परिसरात केवळ 900 अधिकृत वीज कनेक्शन होते. अनधिकृत वीज कनेक्शन 3 हजार 800 हून अधिक होती.

याची नोंद महावितरणकडे आहे. वीज चोरीच्या प्रकारांना लगाम घातला पाहिजे. नवीन केबल, वीज कर्मचाऱ्यांचा अभाव, देखभाल-दुरूस्तीची कामांत दिरंगाई अशा समस्या आहेत. त्यावर ठोस उपायोजना करण्यासाठी लघु उद्योजक संघटना, स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे केली. यावर राज्यमंत्री मेघना बोर्डीकर- साकोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पवार पब्लिक स्कूलच्या जयश्री नवले यांना 'महाराष्ट्र भाषा रत्न' पुरस्कार प्रदान

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पवार पब्लिक स्कूलच्या ज्येष्ठ शिक्षिका जयश्री किरण नवले यांना यावर्षीचा मानाचा 'आदर्श शिक्षिका महाराष्ट्र भाषा रत्न' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अमृतानुभव फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित 'विश्व मराठी भाषा कर्तृत्व संमेलन २०२६' मध्ये हा दिमाखदार सोहळा पार पडला. जागतिक मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून, जयश्री नवले यांची या पुरस्कारासाठी एकमताने निवड करण्यात आली. हा सन्मान सुप्रसिद्ध पार्श्वगायक ज्ञानेश्वर मेश्राम (सारेगमप फेम), सांगलीचे युवा उद्योजक राहुल पाटील, चित्रपट निर्माते व लेखक संदीप राक्षे, शास्त्रीय नृत्य कलाकार कु. रुचिरा आणि स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. बी. एन. खरात (युवा पुरस्कार विजेते, महाराष्ट्र शासन) यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराला उत्तर देताना जयश्री नवले भावूक झाल्या. त्या म्हणाल्या, "हा सन्मान माझ्या गुरुजनांचा, आई-वडिलांचा, सासरच्या मंडळींचा आणि पवार पब्लिक स्कूलच्या प्राचार्या दीपा शानबाग मॅडम, सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या प्रेमाचे फळ आहे. या पुरस्कारामुळे मराठी भाषेची सेवा करण्याची माझी जबाबदारी अधिक वाढली असून, यापुढे अधिक निष्ठेने कार्य करण्याची ग्वाही मी देते." या यशामुळे पवार पब्लिक स्कूल आणि शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त चाळकवाडी ते नाणेघाट भव्य मराठी राजभाषा दिंडी

■ नाणेघाटातील मराठी भाषेच्या आद्य शिलालेखाचे पूजन

जुन्नर (दैनिक संध्या) : मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त चाळकवाडी (ता. जुन्नर) येथील ग्रामस्थ, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमी यांच्या उत्स्फूर्त सहभागातून ३३ वे शिवांजली साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी चाळकवाडी ते नाणेघाट आणि पुन्हा नाणेघाट ते चाळकवाडी अशी भव्य मराठी राजभाषा दिंडी काढण्यात आली. महाराष्ट्र साहित्य परिषद, शिवांजली साहित्यपीठ तसेच अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था (चाळकवाडी, पिंपळवंडी व भोसरी शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने गेली बत्तीस वर्षे हा साहित्य महोत्सव आयोजित केला जात आहे. मराठी भाषा दिनानिमित्त विविध सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. दिंडीचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य मंगेश काकडे, पंचायत समिती सदस्य जयसिंग पोटे, तुकाराम वैधे, अंकुश सोनवणे, लक्ष्मण क्षीरसागर, शिवांजलीचे प्रवर्तक शिवाजीराव चाळक, प्रदीप चाळक, प्रदीप वायकर, अजित पायमोडे, संदीप वाघुले, रोहिदास दुरगुडे, शुभम निमसे, विश्वजित चाळक, नाथामहाराज भटकळ, नानामहाराज चाळक, भानुदास चासकर, गणेश जाधव, सुजित साबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. जुन्नर येथे उज्वला शेवाळे, अनिता काजळे, महानंदा हिरमेठ व वैष्णवी चतुर यांनी दिंडीचे स्वागत केले. सोमतवाडी येथे सुनील जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यावेळी मिलिंद घोडेकर, प्रशांत खत्री, डॉ. अमोल पुंडे व मनीषा जाधव उपस्थित होते. घाटघर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा जयजयकार करत महाराष्ट्र गीत सादर केले. हजारो वर्षांचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नाणेघाट येथे असलेल्या मराठी भाषेच्या आद्य शिलालेखाचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास गट शिक्षण अधिकारी अशोक लांडे, पर्यटन विकास संस्थेचे अध्यक्ष यश मस्करे, हभप अर्चनाताई नेवकर, स्मिताताई शिंदे, बाळकृष्ण चाळक, निवृत्ती पाटोळे, संपत बोऱ्हाडे, नंदू विधाते, भारत थोरवे, अनिकेत हुकरे, प्रशांत लोखंडे, पुष्पलता उकिरडे, बाळासाहेब शिंदे, संजय वाघ, बाबासाहेब जाधव आदी उपस्थित होते. ग्रामीण भागातून मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांमुळे भाषाभिमान अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.







# एकाच दिवसात दोन अपघात

## एकाचा जागीच मृत्यू तर एक जखमी

**पुणे सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन पोलीस स्टेशन हद्दीत एकाच दिवसात दोन अपघात एकाचा जागीच मृत्यू तर एक जण जखमी झाला असल्याची घटना घडली आहे. पुणे–सोलापूर महामार्गावरील कोरेगाव मूळ ग्रामपंचायत हद्दीतील प्रयागधाम फाटा येथे रविवारी (ता. १ मार्च) पहाटे सव्वा पाचच्या सुमारास तीन ट्रकांचा भीषण आणि विचित्र अपघात झाला. या साखळी अपघातात सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी एक चालक किरकोळ जखमी झाला असून तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे हा महामार्ग आता अक्षरशः 'मृत्यू सापळा' ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.**

उरुळी कांचन (दै. संध्या)

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच ११ एएल ६१२१ क्रमांकाचा सहा टायर ट्रक गोळी पेंड घेऊन सोलापूर दिशेने येत होता. चाकणकडे वळण्यासाठी तो प्रयागधाम फाटा येथे थांबला असताना मागून येणाऱ्या (एमएच ०४ केएफ १२४१) क्रमांकाच्या कंटेनरने (चालक – मालक मंडल, वय ३५, रा. मुंबई) जोरदार धडक दिली. या धडकेने ६१२१ क्रमांकाचा ट्रक महामार्गाच्या सोलापूरकडे जाणाऱ्या लेनमध्ये ढकलला गेला. त्याच वेळी (एमएच ४३ सीके ५४२२) क्रमांकाचा १४ टायर केमिकल टँकर वेगात येत होता. टँकरने ट्रकच्या साईडला जबर धडक दिल्याने ट्रक पलटी झाला. अपघातात तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून कंटेनर चालक किरकोळ जखमी झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच उरुळी कांचन चे पोलीस उपनिरीक्षक अनिल खोमणे, पो हवा उद्धव गायकवाड, निलेश जाधव, हरीश शितोळे, पो कॉन्स्टेबल राजकुमार भिसे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने हटवून वाहतूक सुरळीत केली. दुसरा अपघात रविवार ता. १ मार्च रोजी दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान पुणे सोलापूर महामार्गावरील सोरतापावाडी ग्रामपंचायत हद्दीतील देवकर पेट्रोल पंपसमोर समोर सोलापूर दिशेला एका दुचाकीचा अपघात झाला त्यात जगन्नाथ शरणाप्पा रेड्डी, (वय ५० वर्ष,) मजुर कामगार सध्या रा. कुंजीरवाडी तालुका हवेली - मुळगाव शहाबादवाडी, ता. कलबुर्गी जिल्हा गुलबर्गा याचा जागीच मृत्यू झाला. यावेळी कदम ॲम्बुलन्सचे चालक मचींद्र पवार यांनी रुग्णाला पुढील उपचारासाठी दाखल केले. "उरुळी कांचन परिसरात अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी पोलीस स्टेशनसमोर एका शेतकऱ्याचा कंटेनरखाली चिरडून मृत्यू झाला होता. महिनाभरापूर्वी प्रयागधाम फाट्यावर स्कॉर्पिओच्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू, तर तिघे गंभीर जखमी झाले होते. पुणे–सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन परिसरात सुरक्षिततेच्या ठोस उपाययोजना तातडीने राबविल्या नाहीत, तर हा 'मृत्यू सापळा' आणखी किती कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त करणार, हा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे."

> लोकप्रतिनिधींचे पत्र पण अंमलबजावणी कधी? शिरूर हवेलीचे खासदार अमोल कोल्हे यांनी अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांना पत्रव्यवहार केल्याची माहिती आहे. मात्र, त्या पत्राची अंमलबजावणी नेमकी कधी होणार?

> "वेगमर्यादेची अंमलबजावणी होत नाही, चेतावणी फलक व रंबल स्ट्रिप्स अपुरे परिणामी सतत अपघात,महामार्गावरील चौकांवर सुरक्षिततेची मोठी कमतरता आहे. सतत अपघात होत असताना प्रशासन मात्र दुर्लक्ष करत आहे. किती बळी गेल्यावर उपाययोजना होतील?"
>
> **— विशाल शितोळे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष, कोरेगाव मूळ.**

> उरुळी कांचन परिसर अपघातांचे हॉटस्पॉट का ठरत आहे? वेगमर्यादा नियंत्रणासाठी कॅमेरे, पोलिसांची कायमस्वरूपी तैनाती कधी? सतत होणाऱ्या अपघाताला, नागरिकांचा जीव जाण्याला जबाबदार कोण?

## वाढीव वीजदर, प्रलंबित अनुदानामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका!

तळेगाव दाभाडे (दै. संध्या)

आशिया खंडातील फुलांची मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेला तळेगाव येथील 'फ्लोरिकल्चर पार्क'ला सध्या भीषण आर्थिक संकटाचा सामना करत आहे. वाढीव वीजदर आणि शासनाकडून प्रलंबित असलेले अनुदान यामुळे येथील फूल उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळे प्रकल्पाच्याच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. फ्लोरिकल्चर पार्कमधील हरितगृहांना लागणारी वीज ही शेती पंपाच्या दराने मिळणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात व्यावसायिक दराने वीज आकारली जात असून तशी देयके येत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. वीजदर गगनाला भिडल्याने फुलांच्या उत्पादनाचा खर्च कित्येक पटीने वाढला आहे. परिणामी, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करणे स्थानिक उत्पादकांना कठीण जात असून अनेक प्रकल्प बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घेऊन हे प्रकल्प उभे केले. शासनाकडून ठराविक अनुदान मिळणे अपेक्षित होते; मात्र तांत्रिक कारणे आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे हे अनुदान अद्याप मिळालेले नाही. दुसरीकडे, बँकांनी कर्जवसुलीसाठी तगादा लावण्यास सुरुवात केली असून जप्तीच्या नोटिसा पाठवल्या जात आहेत.

## जुन्नर तालुक्यातील ३ विद्यार्थ्यांची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

नारायणगाव (दै. संध्या)

ज्ञाता एज्युकेशनल रिसर्च ॲन्ड कौन्सेलिंग सेंटर, नारायणगाव च्या माध्यमातून घेण्यात येणारा दिव्यदृष्टी ब्रेन डेव्हलपमेंट प्रोग्राम च्या तीन विद्यार्थ्यांची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद घेतली आहे. जुन्नर तालुक्यातील पहिल्यांदाच एकाच वेळी तीन मुलांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड केल्याने संपूर्ण तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षक श्री ज्ञानेश्वर ढोमसे यांनी मार्गदर्शन केले आहे. या विद्यार्थ्यांमध्ये श्री सुनील टाव्हरे या विद्यार्थ्याने डोळ्याला ब्लाइंड फोल्ड लावून केवळ 27 सेकंदामध्ये पिरॅमिक्स क्यूब सोडविला आहे. तर निरंजन शारदा जंगले या 11 वर्षीय इयत्ता 5 वी मध्ये




शिकणाऱ्या विद्यार्थ्याने श्रीदासबोध ग्रंथातील 229 शब्द केवळ दोन मिनिटांमध्ये डोळे बंद करून ब्लाइंड फोल्ड लावून वाचन केलेले आहेत. त्याचबरोबर विहा स्वप्निल जुन्नरकर या विद्यार्थिनीने केवळ एका मिनिटांमध्ये 38 फ्लॅश कार्ड ओळखले तेही डोळे बंद असताना. यासाठी तिची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाली असून इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड च्या रेकॉर्ड मॅनेजर मानसी सतीजा यांनी याची अधिकृत माहिती दिली आहे. सर्व विद्यार्थी मागील एक वर्षापासून नारायणगाव येथील ज्ञाता एज्युकेशनल रिसर्च अँड काउंसेलिंग सेंटर या संस्थेच्या दिव्यदृष्टी ब्रेन डेव्हलपमेंट प्रोग्राम मध्ये सहभागी झाले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये त्यांना ब्रेन जिम, मेडिटेशन यासारखे अनेक मेंदूला चालना देणारे अनेक व्यायाम शिकविले गेले. प्रशिक्षक म्हणून ज्ञानेश्वर ढोमसे यांनी त्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन केलेले आहे.

आजच्या टीव्ही, मोबाईल आणि सोशल मीडियाच्या विळख्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांच्या पिढीमध्ये आपली एकाग्रता आणि अंतर्ज्ञान विकसित करणाऱ्या या विद्यार्थ्यांना विद्यार्थी आदर्श आणि अव्वल मानले जात आहे. या तीनही विद्यार्थ्यांच्या विशेष बुद्धिमत्तेचे सर्वत्र कौतुक केले जात असून भेटलेला प्रत्येक व्यक्ती त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिल्याशिवाय पुढे जात नसल्याचे निदर्शनास येत आहे.

## प्रयोगशील शेतकरी दीपक जगताप यांनी घेतले स्ट्रॉबेरीचे विक्रमी उत्पादन

नीरा (दै. संध्या)

बारामती तालुका म्हटलं की उसाची हिरवीगार शेती आणि पारंपरिक पिकांची ओळख डोळ्यासमोर उभी राहते. मात्र याच भागातील निंबुत येथील उष्ण व तुलनेने कोरड्या पठारी वातावरणात थंड हवामानातील स्ट्रॉबेरीचे यशस्वी उत्पादन घेऊन प्रयोगशील शेतकरी दीपक जगताप यांनी शेतीत नवा आदर्श निर्माण केला आहे. केवळ प्रयोग म्हणून सुरू केलेली ही लागवड आज आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असून आधुनिक आणि विज्ञानाधारित शेतीचा प्रभावी नमुना ठरली आहे.

दीपक जगताप यांना अंजीर शेतीचा तब्बल १७ ते १८ वर्षांचा अनुभव आहे. सुमारे सात एकर क्षेत्रावर त्यांनी अंजीर बाग विकसित केली आहे. याच अनुभवाच्या बळावर त्यांनी स्ट्रॉबेरी लागवडीचा धाडसी निर्णय घेतला. बारामतीच्या हवामानात हे पीक शक्य नसल्याचे अनेकांनी सांगितले, तरीही त्यांनी पिकाचे सूक्ष्म निरीक्षण, व्यवस्थापन आणि योग्य नियोजनावर भर देत यश मिळवले.

जगताप यांच्या मते, पिकाची 'भाषा' समजून घेणे हेच खरे तंत्रज्ञान आहे. पानांचा रंग, वाढ आणि हालचाली यावरून अन्नद्रव्यांची गरज ओळखणे, रोगांची सुरुवातीची लक्षणे वेळेत ओळखणे आणि तत्काळ उपाययोजना करणे — या पद्धतीमुळे उत्पादनात सातत्य राखता आले. थ्रिप्स, माईट्स आणि मूळकुज यांसारख्या समस्यांवर त्यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून नुकसान टाळले.

**निंबुतच्या पठारावर**
**स्ट्रॉबेरीचा गोडवा**

"झाड काय सांगतं हे पानं पाहून समजलं पाहिजे; खत आणि औषध कधी द्यायचं हे निसर्गच शिकवतो," असे ते सांगतात.

वाई परिसरातून 'विंटर' वाणाची सुमारे १० हजार रोपे आणून त्यांनी लागवड केली. मात्र पारंपरिक पद्धतीऐवजी स्थानिक हवामानाचा अभ्यास करून त्यांनी काही बदल केले. ऑक्टोबरच्या उष्णतेपासून संरक्षण मिळावे म्हणून लागवडीनंतर तात्काळ प्लॅस्टिक मल्चिंग न करता तीन आठवड्यांनी ते करण्यात आले. तसेच उसाच्या पाचटाचा वापर करून 'स्ट्रॉ मल्चिंग' केल्याने जमिनीचे तापमान नियंत्रित राहिले, ओलावा टिकून राहिला आणि रोपांना नैसर्गिक गारवा मिळाला. या सूक्ष्म हवामान व्यवस्थापनामुळे प्रतिकूल परिस्थितीतही पीक जोमाने वाढले.

या प्रयोगाचे अर्थकारणही लक्षवेधी ठरले आहे. पारंपरिक उसासाठी एक एकर क्षेत्र आणि सुमारे १८ महिन्यांचा कालावधी लागतो, ज्यातून साधारण १.५ ते २ लाख रुपये निव्वळ उत्पन्न मिळते. याउलट जगताप यांनी केवळ १० गुंठे क्षेत्रात स्ट्रॉबेरीची लागवड केली. सुरुवातीला लेंडी खत व गांडूळ खताचा वापर करून बेड तयार करण्यात आले. सुरुवातीच्या काळात उत्पादन कमी — एका वेळी १० ते २० किलोपर्यंत — मिळत असल्याने चिंता होती; मात्र पुढे उत्पादन वाढत गेले आणि चांगला बाजारभावही मिळाला.

फक्त पाच ते सहा महिन्यांत सुमारे ९ ते ९.५ लाख रुपयांचे उत्पादन मिळाले. सुमारे चार लाख रुपयांचा खर्च वजा जाता त्यांना ४.५ ते ५ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे. पुढील दोन महिन्यांत आणखी उत्पादन मिळण्याची अपेक्षा असून उत्पन्नात लक्षणीय वाढ होण्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. कमी क्षेत्र, कमी कालावधी आणि अधिक उत्पन्न या सूत्रामुळे हा प्रयोग सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

उत्पादनाबरोबरच मार्केटिंगवरही त्यांनी विशेष भर दिला. स्थानिक बाजारपेठेवर अवलंबून न राहता कोल्हापूर, बेळगाव आणि बेंगळुरू येथे थेट माल पाठवण्यात आला. लवकर लागवड केल्यामुळे सुरुवातीला प्रति किलो सुमारे ३०० रुपयांपर्यंत दर मिळाला. नंतर दर कमी झाला तरी सातत्यपूर्ण उत्पादनामुळे उत्पन्न स्थिर राहिले.

१० गुंठ्यांसाठी जवळपास ९० हजार रुपयांची रोपे खरेदी करणे हे मोठे धाडस होते; मात्र त्यामागे अभ्यासपूर्ण नियोजन होते. शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहिल्यासच ती फायदेशीर ठरते, असा त्यांचा ठाम विश्वास आहे.

"कष्टांसोबत विज्ञान आणि नियोजनाची जोड दिली तर शेती अमर्याद संधी देते. तरुणांनी प्रयोग करण्यास घाबरू नये," असा संदेश त्यांनी दिला.

निंबुतच्या पठारावर उमललेली ही स्ट्रॉबेरी केवळ गोड फळ नसून बदलत्या भारतीय शेतीचे प्रतीक ठरत आहे. मेहनत, विज्ञान आणि धाडस यांच्या संगमातून कमी क्षेत्रातूनही मोठे यश मिळू शकते, हे दीपक जगताप यांच्या प्रयोगातून अधोरेखित झाले आहे.



# ५ मार्चची रात्र ठरणार भाग्योदयाची!

## गुरु-सूर्य नवपंचम राजयोगाने या ३ राशींचे नशीब पलटणार



सूर्य हा आत्मविश्वास, सत्ता आणि प्रतिष्ठेचा प्रतीक ग्रह आहे. या दोन प्रभावी ग्रहांमध्ये ५ मार्च रोजी रात्री १०:४१ वाजता १२० अंशांचा शुभ संबंध निर्माण होत असून त्यातून नवपंचम राजयोगाची निर्मिती होत आहे.

वैदिक ज्योतिषशास्त्रात देवगुरू म्हणून ओळखले जाणारे बृहस्पति हे ज्ञान, धर्म, भाग्य, विवाह, संतती आणि संपत्तीचे कारक मानले जातात. तर सूर्य हा आत्मविश्वास, सत्ता आणि प्रतिष्ठेचा प्रतीक ग्रह आहे. या दोन प्रभावी ग्रहांमध्ये ५ मार्च रोजी रात्री १०:४१ वाजता १२० अंशांचा शुभ संबंध निर्माण होत असून त्यातून नवपंचम राजयोगाची निर्मिती होत आहे.

नवपंचम राजयोग तेव्हा तयार होतो, जेव्हा दोन ग्रह एकमेकांपासून पंचम (5वा) आणि नवम (9वा) भावाच्या संबंधात येतात. सध्या गुरु मिथुन राशीत असून सूर्य कुंभ राशीत आहे. या कोनस्थितीमुळे काही राशींना विशेष लाभ मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हे विश्लेषण चंद्र राशीवर आधारित आहे.

मेष (Aries) : मेष राशीच्या जातकांसाठी हा राजयोग उत्साहवर्धक मानला जात आहे. गोचर कुंडलीनुसार तृतीय भावात गुरु आणि एकादश भावात सूर्य असल्याने सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचे संकेत दिसत आहेत.

करिअरच्या दृष्टीने दीर्घकाळ केलेल्या परिश्रमांना फळ मिळू शकते. पदोन्नती, वेतनवाढ किंवा वरिष्ठांकडून प्रशंसा मिळण्याची शक्यता आहे. नव्या प्रकल्पांमध्ये नेतृत्वाची संधी मिळू शकते.

व्यवसायिकांसाठी नवीन करार, भागीदारी किंवा गुंतवणुकीतून लाभ होण्याचे संकेत आहेत. संततीसंबंधित चिंता कमी होऊ शकतात. कौटुंबिक वातावरण आनंदी राहण्याची शक्यता आहे.

कन्या (Virgo) : कन्या राशीच्या जातकांसाठी नवपंचम राजयोग व्यावसायिक प्रगतीस चालना देणारा ठरू शकतो. दशम भावातील गुरु आणि षष्ठ भावातील सूर्य कार्यक्षेत्रात स्पर्धात्मक लाभ देऊ शकतात.

नोकरीत नवीन जबाबदाऱ्या, बढती किंवा प्रतिष्ठा वाढण्याची शक्यता आहे. अडकलेली कामे पूर्ण होण्याची चिन्हे आहेत. व्यावसायिकांना प्रलंबित करार पूर्ण होण्याचा लाभ मिळू शकतो.

आर्थिक बाबतीत उत्पन्नवाढ संभवते; मात्र खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. वैवाहिक जीवनात समतोल आणि परस्पर समज वाढू शकते.

मिथुन (Gemini) : मिथुन राशीतच गुरुचा गोचर असल्याने या राशीवर या योगाचा अधिक ठळक प्रभाव दिसू शकतो. लग्नभावातील गुरु आत्मविश्वास वाढवू शकतो, तर नवम भावातील सूर्य भाग्यवृद्धीची चिन्हे दर्शवितो.

करिअरमध्ये नवीन संधी, नोकरी बदल किंवा प्रकल्पातील यश मिळू शकते. वरिष्ठांचा विश्वास संपादन करण्यास मदत होईल. उद्योजकांसाठी विस्ताराची संधी उपलब्ध होऊ शकते.

आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. वैवाहिक आणि प्रेमसंबंधांमध्ये सौहार्द वाढेल. आरोग्यदृष्ट्या ऊर्जा आणि सकारात्मकता जाणवू शकते.

ज्योतिषीय दृष्टीकोन : नवपंचम राजयोग हा भाग्य, शिक्षण, संतान आणि धर्माशी संबंधित फल देणारा योग मानला जातो. तथापि, वैयक्तिक कुंडलीतील ग्रहस्थिती, दशा आणि अंतर्दशा यानुसार फलांमध्ये फरक संभवतो. त्यामुळे वैयक्तिक सल्ल्यासाठी तज्ज्ञ ज्योतिषांचा सल्ला घेणे उचित ठरेल.

**(सूचना: वरील माहिती पारंपरिक ज्योतिषीय मान्यतांवर आधारित आहे.)**

# 'स्मार्ट अर्नर्स' गरज नसतानाही कर्ज का घेत आहेत ?

कर्ज केवळ आपत्कालीन परिस्थितीत काढायचे या विचारात मोठा बदल होत आहे; उपभोक्ते मालमत्ता, शिक्षण, प्रवास, आरोग्याची काळजी यांपासून अगदी जीवनशैलीविषयक गरजांपर्यंत विविध कारणांसाठी व्यक्तीगत कर्जे घेत आहेत. व्यक्तीगत कर्जे (पर्सनल लोन्स) घ्यायची ती केवळ 'आणीबाणीच्या परिस्थिती'त ही धारणा भारतात हळूहळू बदलत चालली आहे. स्थिर नोकऱ्या आणि व्यवस्थित पगार असलेल्या उपभोक्तावर्गामध्ये हे स्थित्यंतर विशेषत्वाने दिसत आहे. अनेक वर्षांपासून आर्थिक शिस्त पाळत आलेल्या, दीर्घकालीन बचत उभी करत असलेल्या आणि सातत्याने गुंतवणूक करत असलेल्या वर्गामध्ये हा बदल दिसून आला आहे.



• कर्जाच्या अटी व शुल्के अधिक स्पष्ट व पारदर्शक असतात. • वितरण अधिक वेगाने होते, हे कर्ज उपलब्ध होण्यासाठी अधिक सोपे असते. • हप्त्यांची रचना सुलभ असल्याने त्यानुसार आर्थिक नियोजन करणे सोपे जाते. • डिजिटल प्रवासामुळे ग्राहकांना स्वतःच्या सोयीने प्रक्रिया पूर्ण करण्याची मुभा मिळते. "आम्हाला आत्मविश्वासपूर्ण स्थित्यंतर दिसत आहे: उत्तम उत्पन्न आणि शिस्तबद्ध गुंतवणूक सवयी असलेले ग्राहक स्वास्थ्य, आयुष्यातील अनुभव व दीर्घकाळापासून पूर्ण न झालेल्या आकांक्षा आदी अर्थपूर्ण उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी दीर्घकालीन गुंतवणूक न मोडता, व्यक्तीगत कर्जाचा उपयोग करत आहेत. कोविड साथीनंतर अनेक जण स्वतःची काळजी घेणे व दीर्घकाळ बाळगलेली स्वप्ने पूर्ण करणे या गोष्टींना प्राधान्य देऊ लागले आहेत, या गोष्टींकडे आता चैन म्हणून बघितले जात नाही. अशा ग्राहकांसाठी कोटक पर्सनल लोन्स हा सहज पर्याय ठरत आहे. शिस्तीने उभ्या केलेल्या दीर्घकालीन गुंतवणूका थांबवणे किंवा मोडणे टाळण्यासाठी ते कर्ज काढत आहेत. व्यक्तीगत कर्जामुळे त्यांना वर्तमानकाळ भरभरून जगण्यात आणि त्याच वेळी भविष्यकाळातील नियोजन सुरक्षित राखण्यात मदत होत आहे," असे कोटक महिंद्रा बँकेच्या पर्सनल लोन्स विभागाचे व्यवसाय प्रमुख अमित पाठक म्हणाले.

विशेषतः कोविड साथीनंतर त्यांची गुंतवणूक करण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला नसला तरी 'पैसा गुंतवण्याची' व्याख्या मात्र खरोखर बदलली आहे. आर्थिक भवितव्यासाठी योग्य ती काळजी घेतली जात असली तरी आरोग्य, मन आणि शरीर यांच्यासाठी आवश्यक गुंतवणूकीकडे नकळतच दुर्लक्ष झाल्याचे अनेकांच्या लक्षात आले. त्यानंतरच्या काळात हे आकलन अधिक पक्के होत गेले आहे, कारण कामाच्या दृष्टीने अत्यंत व्यस्त आयुष्य आणि वेगवान दिनक्रम यांमध्य स्वास्थ्य जपणे, स्वतःची काळजी घेणे किंवा आयुष्याचा दर्जा सुधारणे यांसारख्या गोष्टींकडे लोक आता स्वतःचे लाड पुरवणे म्हणून बघत नाहीत तर आवश्यक बाबी म्हणून बघू लागले आहेत.

परिणामी आजचे कर्जदार अधिक स्पष्टतेने आणि हेतूपूर्वक खर्च करू लागले आहेत. स्वास्थ्य, शिक्षण, अर्थपूर्ण अनुभव, घराची आरामदायकता आणि व्यक्तिगत इच्छाआकांक्षा या दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या उद्दिष्टांना त्यांच्याकडून आता प्राधान्य दिले जाऊ लागले आहे. मात्र कष्टाने उभ्या केलेल्या गुंतवणूका या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वापरण्याची त्यांची इच्छा नाही. ते हप्ते भरण्यास सक्षम आहेत आणि त्यांचे एसआयपी, दीर्घकालीन पोर्टफोलिओ व निवृत्तीनंतरच्या काळासाठी केलेल्या तरतूदींना धक्का न लावता त्यांना अन्य उद्दिष्टांसाठी खर्च करायचा आहे.

या परिस्थितीत व्यक्तीगत कर्ज हा व्यवहार्य पर्याय ठरतो. हप्त्याचा (ईएमआय) आकडा माहीत असेल तर तो वजा करून दैनंदिन खर्चांचे नियोजन करता येते आणि दीर्घकालीन गुंतवणूकींना हात न लावता त्या सुरू ठेवता येतात. थोडक्यात, 'स्वप्नपूर्ती'साठी कर्ज काढण्याबाबतची पारंपरिक कल्पना आता नव्याने केली जाऊ लागली आहे. आज कर्ज काढणाऱ्या अनेकांनी आधीच गुंतवणूका केलेल्या असतात- आपला संपदासंचयाचा प्रवास न थांबवता उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी ते सहजपणे व्यक्तीगत कर्जाचा पर्याय निवडतात.

अधिक व्यवहार्य कर्जदार मानसिकता या नवीन प्रवाहाचा गाभा आहे. तात्पुरत्या गरजा पूर्ण करण्यासाठी दीर्घकालीन गुंतवणुकांमधून पैसे काढण्याकडे बहुतेकांचा कल नसतो, कारण त्यामुळे संपदासंचयात खंड पडतो, भविष्यकाळातील लाभ कमी होऊ शकतात आणि काही वेळा तर भांडवलावरील नफ्यावर (कॅपिटल-गेन) कर वगैरे भरावा लागू शकतो. त्याऐवजी निश्चित हप्ता वजा करून अत्यावश्यक गरजा भागवण्याइतपत पैसा हातात राहतो आणि एसआयपी, इक्विटीतील गुंतवणूक आणि निवृत्तीनंतरच्या तरतूदी यांना धक्का लागत नाही. सर्व शहरांमध्ये वास्तव आयुष्यातील गरजांकडे लक्ष देण्याची मानसिकता दिसून येत आहे- काही जण स्वास्थ्यावर लक्ष केंद्रित करतात, तर काही आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांना महत्त्व देतात. दीर्घकाळापासूनच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी मालमत्ता उभी करण्याचे प्रमाणही वाढत आहे. उपभोक्ते व्यक्तीगत कर्जाचा वापर त्या वेळी आवश्यक असलेल्या गोष्टी पार पाडून आयुष्यात पुढे जाण्यासाठी करत आहेत आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजनात काहीच बदल न करता हे शक्य होत आहे. कर्ज घेण्याच्या नमुन्यांमधून नियोजित वापराचे विस्तृत प्रकार दिसून येतात. ते पुढीलप्रमाणे: ग्राहकांमध्ये विस्तृत 'जीवनविषयक गुंतवणुकीं'साठी व्यक्तीगत कर्जांचा वापर करण्याचे प्रचलन वाढत आहे, यात आकांक्षा आणि स्वास्थ्य यांचा मेळ साधलेला दिसतो: केवळ प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन घेण्याच्या पलीकडील उपक्रमाभिमुख अनुभवाधारित प्रवासासाठी व्यक्तीगत कर्जे घेतली जात आहेत; निसर्गाचे सान्निध्य, शांतता, ध्यानधारणा व डिजिटल साधनांपासून दूर राहणे अशा पद्धतीने विकसित केलेल्या 'वेलनेस रिट्रीट्स'चा अनुभव घेण्यासाठी व्यक्तीगत कर्जे घेतली जात आहेत; त्वचेवरील उपचार, केसाचे प्रत्यारोपण व निवडक सौंदर्योपचार प्रक्रिया यांसारख्या आत्मविश्वास वाढवणाऱ्या पण अनेक वर्षांपासून पुढे ढकलल्या जाणाऱ्या स्वतःची काळजी घेण्याच्या पद्धतींसाठी व्यक्तीगत कर्जे घेतली जात आहे. याशिवाय शिक्षण व कौशल्यविकास तसेच घराचे आरामदायीत्व वाढवणे, घरातील दुरुस्त्या यांवर हेतूपूर्वक केल्या जाणाऱ्या खर्चात स्पष्ट वाढ दिसून येत आहे. ज्यात वेळ अत्यंत महत्त्वाची असते अशा आयुष्यांतील महत्त्वाच्या क्षणांवर, मग ते लग्नसोहळे असोत, कौटुंबिक सोहळे असोत किंवा महत्त्वाचे उत्सव असोत, खर्च करण्यासाठी व्यक्तीगत कर्ज काढण्याचे प्रमाण वाढले आहे. व्यक्तीगत कर्जांचा उपयोग व्यवहार्य, दैनंदिन आर्थिक नियोजनासाठीही केला जात आहे. अनेक ग्राहक या कर्जांचा वापर सर्व देय रकमा एका ठिकाणी आणण्यासाठीही (डेट कन्सॉलिडेशन) करत आहेत, त्यामुळे सर्व निश्चित खर्च एका हप्त्यामध्ये सामावले जातात, आर्थिक बाबींवर आपले नियंत्रण वाढते आणि मन:शांतीही मिळते. काही जण व्यक्तीगत कर्जाचा वापर वाहनाशी निगडित पैशाची तफावत भरून काढण्यासाठी तसेच पुढे न ढकलता येणाऱ्या अत्यावश्यक सुधारणांसाठी करतात. आपली पत रूपरेखा (क्रेडिट प्रोफाइल) सुधारण्याही जाणूनबुजून व्यक्तीगत कर्ज काढणाऱ्यांच्या संख्येतही वाढ होत आहे. व्यक्तीगत कर्जे घेऊन ती शिस्तबद्ध, वक्तशीर हप्त्यांद्वारे फेडल्यास कर्जदाराची क्रेडिट प्रोफाइल चांगली होते, भक्कम होते. क्रेडिट प्रोफाइल निकोप असेल भविष्यकाळातील कर्ज मिळवण्याची पात्रता वाढते तसेच भविष्यकाळात कर्जदाराला अनुकूल अटींवर कर्ज घेता येते. महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाकल्यास त्याची काय किंमत मोजावी लागू शकते हेही कर्जदारांना पुरते लक्षात आले आहे. मग तो निर्णय दैनंदिन राहणीमानाचा दर्जा सुधारणारी घरातील दुरुस्तीची कामे करण्याचा असो किंवा अत्यंत तणावाच्या दिनक्रमात स्वतःची काळजी घेण्याचा असो. अनेकांच्या मते व्यक्तीगत कर्ज घेणे म्हणजे आजच्या गरजांचा व उद्याच्या उद्दिष्टांचा तोल जबाबदारीने सांभाळणे होय.

**आत्मविश्वास वाढण्यामागील कारणे : व्यक्तीगत कर्ज समजून घेण्यासाठी व नियोजनासाठी अधिक सोपे असते.**

# नवपंचम राजयोगासह वर्षातील पहिले चंद्रग्रहण; या आठवड्यात १२ राशींवर होणार परिणाम

या आठवड्यात चंद्रमा सिंह, कन्या आणि तुला राशीत भ्रमण करणार असून होलिका दहनच्या दिवशी वर्षातील पहिले चंद्रग्रहणही लागणार आहे. त्यामुळे आर्थिक, व्यावसायिक, वैवाहिक आणि आरोग्याशी संबंधित क्षेत्रांमध्ये चढ-उतार संभवतात.



मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ग्रहस्थितीत मोठे बदल होत असून त्याचा थेट परिणाम 12 राशींच्या व्यक्तींवर दिसू शकतो. शुक्र 2 मार्च रोजी मीन राशीत प्रवेश करून शनिसोबत युती करीत आहेत. कुंभ राशीत मंगळ, बुध, सूर्य आणि राहू एकत्र विराजमान असल्याने चतुर्ग्रही योगासह बुधादित्य आणि मंगळादित्य राजयोगाची निर्मिती होत आहे. मिथुन राशीत गुरु बृहस्पति, तर सिंह राशीत केतू स्थित आहेत.

या आठवड्यात चंद्रमा सिंह, कन्या आणि तुला राशीत भ्रमण करणार असून होलिका दहनच्या दिवशी वर्षातील पहिले चंद्रग्रहणही लागणार आहे. त्यामुळे आर्थिक, व्यावसायिक, वैवाहिक आणि आरोग्याशी संबंधित क्षेत्रांमध्ये चढ-उतार संभवतात.

मेष राशीच्या व्यक्तींनी संयम राखणे आवश्यक आहे. मानसिक तणाव वाढू शकतो. उत्पन्न चांगले असले तरी अनावश्यक खर्च त्रासदायक ठरू शकतात. स्पर्धा परीक्षा आणि शिक्षणात अधिक परिश्रमांची गरज आहे. वैवाहिक आयुष्यात किरकोळ मतभेद संभवतात.

वृषभ राशींसाठी आठवडा अनुकूल. उत्पन्नवाढ, करिअरमध्ये प्रगती आणि प्रतिष्ठा वाढण्याची शक्यता. व्यवसायात नवीन संधी मिळू शकतात. प्रेमसंबंध आणि कुटुंबीय जीवनात सकारात्मक वातावरण राहील.

मिथुन राशीच्या लग्नस्थानी गुरु असल्याने भाग्याची साथ लाभेल. आठवड्याच्या उत्तरार्धात प्रभाव वाढेल. उत्पन्नवाढ आणि कामाचा विस्तार संभवतो. प्रेमविवाहाचा विचार करणाऱ्यांनी घाई टाळावी.

कर्क राशीच्या व्यक्तींनी आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे. आठवड्याच्या सुरुवातीला आर्थिक नुकसान संभवते; मात्र नंतर स्थिती सुधारेल. जोडीदाराच्या प्रकृतीची काळजी घ्यावी.

सिंह राशींसाठी सावधगिरीचा इशारा. वाहन चालवताना किंवा प्रवासात काळजी आवश्यक. मोठे आर्थिक निर्णय पुढे ढकलावेत. आत्मविकासासाठी मात्र हा काळ अनुकूल.

कन्या राशीच्या व्यक्तींना नोकरीत प्रगतीची संधी. स्पर्धा परीक्षेत यशाचे संकेत. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. आरोग्याबाबत हलकीशी अस्वस्थता संभवते.

तूळ राशींना मानसिक तणाव जाणवू शकतो. निर्णयक्षमता कमी पडू शकते. कर्ज किंवा मालमत्तेशी संबंधित निर्णय पुढे ढकलावेत. उत्पन्नवाढीसाठी कष्ट करावे लागतील. वृश्चिक राशीच्या व्यक्तींना कुटुंबीय तणावाचा सामना करावा लागू शकतो. उच्च शिक्षणात यश. अनिद्रा किंवा मानसिक अस्वस्थता जाणवू शकते.

धनु राशींसाठी सकारात्मक काळ. सुखसुविधांमध्ये वाढ. जमीन-जुमला, वाहन किंवा विवाह विषयक निर्णय अनुकूल ठरू शकतात. आत्मविश्वास दृढ राहील.

मकर राशींनी आर्थिक बाबतीत सावधगिरी बाळगावी. बचतीत घट संभवते. शिक्षणात प्रगती होईल; मात्र प्रयत्नांवर भर द्यावा.

कुंभ राशींसाठी मिश्र परिणाम. शिक्षण आणि स्पर्धा परीक्षेत लाभ. आरोग्याबाबत दक्षता आवश्यक. धोकादायक गुंतवणूक टाळावी.

मीन राशींसाठी करिअरमध्ये चढ-उतार संभवतात. प्रवासात काळजी घ्यावी. वडिलांचे सहकार्य लाभेल. अध्यात्माकडे कल वाढेल. आठवड्याच्या शेवटी शुभवार्ता आणि प्रतिष्ठावाढीचे संकेत.

# घातक विषाणूच्या संसर्गाने दोन आठवड्यांत ७२ वाघांचा मृत्यू, शेकडो वाघांना धोका

थायलंडमधील एका खाजगी पर्यटन केंद्रात अवघ्या दोन आठवड्यांच्या कालावधीत किमान ७२ वाघांचा मृत्यू झाला आहे, त्यामुळे वन्यजीव अधिकारी आणि प्राणी कल्याण संस्थांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. चोनबुरी प्रांतातील एका पार्कमध्ये या मृत्यूंच्या घटना घडल्याची माहिती आहे. या पार्कमध्ये शेकडो वाघांचे प्रजनन केले जाते. या पार्कमध्ये येणाऱ्या पर्यटकांना वाघांना जवळून पाहण्याची, त्यांच्याबरोबर फोटो काढण्याची आणि स्पर्श करण्याची संधी दिली जाते. एक प्रकारे हा तेथील व्यवसायच आहे. मात्र, वाघांच्या मृत्यूने मोठी खळबळ उडाली आहे. काय आहे नेमके प्रकरण? कोणत्या विषाणूच्या प्रसाराने वाघांचा मृत्यू झाला? माणसांना या विषाणूचा धोका आहे का? सविस्तर जाणून घेऊयात...



७२ वाघांचा मृत्यू वेगाने पसरणाऱ्या विषाणूजन्य संसर्गामुळे झाला आहे. हा संसर्ग 'फेलाइन पॅन्युकोपेनिया' किंवा 'फेलाइन डिस्टेंपर' असल्याचा संशय आहे. हा अत्यंत संसर्गजन्य रोग असून तो कमी रोगप्रतिकारशक्ती असलेल्या मोठ्या प्राण्यांसाठी (वाघ, सिंह इ.) प्राणघातक ठरू शकतो. थाई नॅशनल पार्क, वन्यजीव आणि वनस्पती संवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. त्यांनी परिसराचे विलगीकरण केले आहे आणि उर्वरित प्राण्यांची चाचणी केली जात आहे. या घटनेमुळे थायलंडमधील 'टायगर टुरिझम' उद्योगाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या पार्कमधील प्रजननाच्या पद्धती, पशुवैद्यकीय मानके आणि प्राण्यांच्या कल्याणाबाबत कायमच टीका होत आली आहे. जे पार्क पर्यटकांना वाघांना खाऊ घालण्याची, कुरवाळण्याची किंवा त्यांच्याबरोबर फोटो काढण्याची परवानगी देतात, तिथे वाघांची संख्या खूप जास्त असते आणि त्यामुळे त्यांचे अनुवांशिक व्यवस्थापन आणि रोग नियंत्रणाबाबत प्रश्न निर्माण होतात. वन्यजीव प्रेमींचे असे म्हणणे आहे की, अति प्रजनन आणि प्राण्यांची संख्या जास्त असल्यामुळे संसर्ग वेगाने पसरण्यासाठी परिस्थिती निर्माण झाली आहे. वाघांच्या या मृत्यूंसाठी निष्काळजीपणा, अपुरे लसीकरण प्रोटोकॉल किंवा निकृष्ट प्रतिबंधात्मक उपाय कारणीभूत आहेत का, याचा तपास अधिकारी करत आहेत.

फेलाइन डिस्टेंपर व्हायरस याला 'फेलाइन पॅन्युकोपेनिया व्हायरस' (एफपीव्ही) म्हटले जाते. हा अत्यंत संसर्गजन्य आणि अनेकदा जीवघेणा विषाणूजन्य रोग आहे. याचे नाव 'डिस्टेंपर' असले तरी हा कुत्र्यांमध्ये होणाऱ्या 'कॅनाइन डिस्टेंपर'पेक्षा वेगळा विषाणू आहे. एफपीव्ही हा 'पार्वोव्हायरस' कुटुंबातील आहे. हा विषाणू शरीरातील वेगाने विभाजित होणाऱ्या पेशींवर, विशेषतः हाडांमधील मज्जा, आतडे आणि विकसित होणाऱ्या गर्भावर हल्ला करतो. हा विषाणू अस्थिमज्जेला हानी पोहोचवून पांढऱ्या रक्तपेशींची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करतो; या स्थितीला 'पॅन्युकोपेनिया' म्हणतात. यामुळे संक्रमित प्राण्यांची रोगप्रतिकारशक्ती अत्यंत कमकुवत होते आणि ते इतर दुय्यम संसर्गांना बळी पडतात.

हा आजार संक्रमित प्राण्यांशी थेट संपर्क, त्यांचे पिंजरे, अंथरूण आणि अन्नाची भांडी यांसारख्या दूषिततेमुळे पसरतो. हा विषाणू वातावरणात अनेक महिने जिवंत राहू शकतो, त्यामुळे निवारा केंद्रे किंवा प्रजनन केंद्रांसारख्या गर्दीच्या ठिकाणी हा संसर्ग रोखणे कठीण होते. संक्रमित वाघांना ताप, सुस्तपणा, उलट्या, निर्जलीकरण आणि भूक न लागणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. लहान पिल्ले याला लवकर बळी पडतात आणि वेळेवर उपचार न मिळाल्यास मृत्यूचे प्रमाण जास्त असते. यावर कोणताही विशिष्ट अँटीव्हायरल उपचार नाही. मात्र, वेळेवर पशुवैद्यकीय मदत मिळाल्यास, जसे की सलाईन, दुय्यम संसर्ग टाळण्यासाठी प्रतिजैविके आणि विलगीकरण आदींमुळे जीव वाचण्याची शक्यता वाढते. लसीकरण हाच या रोगाला रोखण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

फेलाइन पॅन्युकोपेनिया विषाणू प्रामुख्याने लाळ, नाकातील द्रव, लघवी आणि विष्ठा यांसारख्या संक्रमित शारीरिक द्रवांच्या थेट संपर्कातून किंवा दूषित वातावरणातून पसरतो. संक्रमित प्राण्यांद्वारे हा विषाणू मोठ्या प्रमाणात बाहेर टाकला जातो आणि तो पिंजरे, खाऊ घालण्याची भांडी आणि काळजी घेणाऱ्यांच्या कपड्यांवरही अनेक महिने टिकून राहू शकतो. या विषाणूचे साध्या स्वच्छतेने निर्मूलन करणे शक्य नसते. संक्रमित प्राणी लक्षणे दिसण्यापूर्वीच विषाणू पसरवण्यास सुरुवात करू शकतात.

बंदिस्त अवस्थेत असलेले प्राणी एकमेकांच्या जवळ असतात, त्यामुळे संक्रमणाचा धोका वेगाने वाढतो. सामायिक जागा, सांडपाण्याची सामायिक व्यवस्था, पाण्याचे साठे आणि विविध पिंजऱ्यांमध्ये एकाच उपकरणांचा वापर केल्यामुळे हा संसर्ग वेगाने पसरू शकतो. टुरिस्ट पार्क किंवा प्रजनन केंद्रांमध्ये हा विषाणू एका पिंजऱ्यातून दुसऱ्या पिंजऱ्यात पोहोचू शकतो. वाघांच्या पिल्लांची रोगप्रतिकारशक्ती पूर्णपणे विकसित झालेली नसल्यामुळे ती अधिक असुरक्षित असतात. जर लसीकरण अपूर्ण असेल किंवा सुरक्षा नियम कमकुवत असतील तर संसर्ग वेगाने पसरून अनेक प्राण्यांना बाधित करू शकतो.

फेलाइन पॅन्युकोपेनिया विषाणू माणसांमध्ये पसरत नाही. हा पार्वोव्हायरस प्रामुख्याने पाळीव मांजरी आणि वाघ, सिंह व बिबट्या यांसारख्या वन्य प्राण्यांना संक्रमित करतो. हा विषाणू विशिष्ट प्रजातींपुरताच मर्यादित आहे, म्हणजेच तो माणसांना संक्रमित करण्याची क्षमता ठेवत नाही. मात्र, असे असले तरी माणूस या विषाणूचे वाहक ठरू शकतात. याचा अर्थ असा की, जर एखादी व्यक्ती संक्रमित प्राण्याला किंवा दूषित वस्तूंना (पिंजरे, कपडे इ.) स्पर्श करते, तर ती नकळतपणे आपल्या कपड्यांवर, बुटांवर किंवा हातांवरून हे विषाणू एका प्राण्याकडून दुसऱ्या प्राण्याकडे नेऊ शकते. परंतु, हा विषाणू मानवी शरीरात वाढू शकत नाही. वाघांमधील फेलाइन पॅन्युकोपेनियावर कोणताही विशिष्ट अँटीव्हायरल औषधोपचार नाही. 'सपोर्टिव्ह केअर' आणि विलगीकरणच यात प्रमुख भूमिका निभावतात. संक्रमित वाघांना निर्जलीकरण टाळण्यासाठी सलाईन देणे, इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखणे आणि उलट्या नियंत्रित करण्यासाठी पशुवैद्यकीय उपचारांची गरज असते. प्राण्याची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत झालेली असताना होणारे जीवाणूजन्य संसर्ग रोखण्यासाठी ब्रॉड-स्पेक्ट्रम प्रतिजैविके दिली जातात. गंभीर प्रकरणांमध्ये जर पांढऱ्या रक्तपेशींची संख्या खूपच कमी झाली, तर पोषण आहार आणि प्लाझ्मा किंवा रक्त पुरवले जाते. वैद्यकीय उपचारांइतकेच कडक सुरक्षा नियम पाळणे महत्त्वाचे आहे. आजारी प्राण्यांना वेगळे ठेवणे, पार्वोव्हायरसवर प्रभावी असलेल्या जंतुनाशकांनी परिसर निर्जंतुक करणे आणि उर्वरित वाघांवर बारीक लक्ष ठेवल्यास हा संसर्ग अधिक पसरणार नाही.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## परतीच्या प्रवासात जेजुरीच्या कुलदैवत जानाई देवीला घालण्यात आले नीरा स्नान

नीरा (दैनिक संध्या) :निवकणे येथील यात्रेवरुन परतीच्या प्रवासाला निघालेला श्री जानाईदेवीचा पालखी सोहळ्याचे आज रविवार (दि.१) रोजी सकाळी नीरा (ता.पुरंदर) येथे आगमन झाले. यावेळी उत्साही वातावरणामध्ये ग्रामस्थांनी सोहळ्याचे स्वागत केले. आज सकाळी नीरा नदीवरील दत्तघाटावर श्री जानाई देवीच्या मुर्तींना शाही स्नान झाल्यानंतर पालखी सोहळा नीरा येथील गणेश दरेकर यांच्या घरी अल्पशा विश्रांतीसाठी विसावला. यावेळी नीरेकरांनी हार-फुले देऊन पालखी सोहळ्याचे स्वागत केले. गणेश दरेकर कुटूंबियांच्या वतीने पालखीचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी पालखीचे मुख्य मानकरी नागनाथ झगडे, दीपक खोमणे, सुधाकर दरेकर, गोरख कदम, किशोर दरेकर,अनिल चव्हाण, रामदास राऊत, सचिन बरकडे, निखिल बनसोडे, प्रसाद शिंदे आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते. आरतीनंतर ग्रामस्थांच्या वतीने पालखी सोहळ्यातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान यावेळी दरवर्षीप्रमाणे गणेश दरेकर व पत्रकार रामदास राऊत यांच्या वतीने पालखी सोहळ्यातील भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. अल्पशा विश्रांतीनंतर पालखी सोहळा पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाला.

## बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करा आणि शेतकऱ्यांना दिवसा वीज द्या



■ आमदार राहुल कुल यांची विधानसभेत आग्रही मागणी

यवत (दैनिक संध्या) : पश्चिम महाराष्ट्रात, विशेषतः पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात वाढलेल्या बिबट्यांच्या वावरामुळे शेतकरी आणि नागरिक प्रचंड दहशतीत आहेत. या गंभीर परिस्थितीवर तातडीने उपाययोजना कराव्यात आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी त्यांना रात्रीऐवजी दिवसा वीज पुरवठा करावा, अशी आग्रही मागणी आमदार राहुल कुल यांनी आज विधानसभेत 'औचित्याच्या मुद्या'द्वारे केली. आमदार राहुल कुल यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की, पुणे जिल्ह्याच्या विविध भागांत बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. शेतात कामासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांवर बिबट्यांचे हल्ले होत असून, यामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. शासनाने यावर उपाययोजना करण्याचे निश्चित केले असले तरी, त्याची अंमलबजावणी अत्यंत वेगाने होणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी शेतात पाणी भरण्यासाठी जाताना बिबट्यांचा धोका सर्वाधिक असतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जिवाचे रक्षण करण्यासाठी वीज वितरण कंपनीने दिवसा वीज पुरवठा करावा. बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने पिंजरे लावणे, गस्त घालणे आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी विनंती त्यांनी माननीय मुख्यमंत्री आणि वनमंत्री यांच्याकडे केली. शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेच्या आणि हक्काच्या प्रश्नावर शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास आमदार राहुल कुल यांनी यावेळी व्यक्त केला. राज्य सरकारने सामान्य शेतकऱ्यांच्या वीज बिलात सवलत किंवा माफी दिली आहे. मात्र, ग्रामीण भागातील जे छोटे शेतकरी एकत्र येऊन 'सहकारी वीज संस्थांच्या' माध्यमातून शेतीपंपाच्यासाठी वीज घेतात, त्यांना अद्याप ही सवलत मिळालेली नाही. हा शेतकरी अत्यंत लहान घटक असून, त्यांनाही वीज बिलातून माफी किंवा सवलत मिळावी, असा महत्त्वपूर्ण मुद्दा आमदार कुल यांनी मांडला.

## ज्ञानराज पब्लिक स्कूल मध्ये विज्ञान दिन उत्साहात साजरा



यवत (दैनिक संध्या) : खामगाव(ता. दौंड) येथील ज्ञानराज पब्लिक स्कूल मध्ये दि. (28 )रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सायन्स अँड आर्ट फेयर 2026 मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग, मॉडेल्स तसेच कला प्रकल्प सादर करून आपल्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट नमुना दाखविला. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून न्यू इंग्लिश स्कूल खामगाव चे प्राचार्य श्री. सूर्यवंशी सर व श्री. दोरगे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व समजावून सांगत संशोधन व नवकल्पनांना प्रोत्साहन दिले. यावेळी ज्ञानराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. महेंद्र जगताप श्री. निलेश नाईक श्री. राजेंद्र जगताप श्री. अनिल शिंगाडे यांच्या सह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान शिक्षिका अनुष्का टिक्के व इतर शिक्षकवृंदाच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टरीत्या करण्यात आले. या कार्यक्रमास पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विज्ञान प्रकल्पांचे पालकांनी मनापासून कौतुक केले व शाळेच्या या उपक्रमाचे अभिनंदन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल आवड निर्माण होऊन त्यांच्या कल्पकतेला व जिज्ञासेला चालना मिळाली आहे.

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने जेजुरी गडावर स्वच्छता अभियान



जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र भूषण डॉ नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्त पद्मश्री महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. दत्तात्रय नारायण तथा आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रेरणेने आणि डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी दिनांक 1 रोजी जेजुरी गड व परिसरात महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या महास्वच्छता अभियानामध्ये सुका कचरा व ओला कचरा जमा करण्यात आला, संपूर्ण परिसरातून एकूण १९६ श्रीसदस्य सहभागी झाले होते, या महास्वच्छता अभियानामध्ये महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाचा जेजुरीगड परिसर कडेपठार पायथा,जेजुरी बस स्थानक,ग्रामीण रुग्णालय आदी परिसर प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांकडून तसेच जेजुरी नगरपरिषदेच्या सहकार्यातून स्वच्छ करण्यात आला. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे विश्वस्त पोपट खोमणे वन अधिकारी सागर ढोले ,जेजुरी नगरपरिषदेचे सुदर्शन काळेल उपस्थित होते.

# नीरेत 'श्री साधकां'चा स्वच्छतेचा महासागर

### शेकडो हातांनी शहराला दिले नवे तेज



नीरा (दै. संध्या)

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या श्री साधकांनी रविवारी (दि. १) नीरा शहरात स्वच्छतेचा अभूतपूर्व जागर उभारला. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी विसावा स्थळापासून सुरू झालेल्या या महास्वच्छता अभियानात शेकडो साधकांनी एकदिलाने सहभाग घेत तब्बल ७.५० टन कचरा गोळा करून शहराला नवसंजीवनी दिली. पहाटेच्या शांत वातावरणात भगव्या टोपीधारी साधकांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि काही तासांतच अस्वच्छतेचे चित्र स्वच्छतेच्या तेजस्वी रूपात बदलले. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या १०४ वी जयंती निमित्त राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचा नीरा येथेही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्री समर्थ बैठक नीरा व श्री समर्थ बैठक वडगाव निंबाळकर यांचे २३० साधक सकाळी सात वाजता नीरा नदीकाठावरील पालखी विसावा स्थळी एकत्र जमले. हातात खराटे, फावडे, कोयते, दातुळ, घमेले आणि पाट्या घेऊन सज्ज असलेल्या साधकांनी आज्ञा मिळताच विविध भागांकडे धाव घेतली. एका गटाने स्मशानभूमी परिसर स्वच्छ केला, तर दुसऱ्या गटाने नीरा नदी पुलालगतच्या महादेव घाटावर साचलेला कचरा हटवला. हणुमान मंदिर परिसर, आठवडे बाजार, जैन मंदिर परिसर, पोलीस दुरक्षेत्र, बाजारपेठेतील मोकळ्या जागा आणि सार्वजनिक स्थळांवरही स्वच्छतेची व्यापक मोहीम राबविण्यात आली. नीरा ग्रामपंचायत प्रशासनाने या अभियानासाठी २ घंटागाड्यांची तर ४ खाजगी वाहनातून गोळा झालेला कचरा त्वरित डंपिंग ग्राऊंडवर पोहोचविण्याची जबाबदारी पार पाडली. प्रतिष्ठानच्या वतीने साधकांना हातमोजे, मास्क, खराटे तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा देण्यात आली. गुळूंचे, कर्नलवाडी, राख, पिंपरे खुर्द, पिसुर्टी, मांडकी, जेऊर, निंबूत, वाणेवाडी (मळशी), वाघळवाडी, सोमेश्वर, वडगाव निंबाळकर, होळ आदी गावांमधून आलेल्या श्री सेवकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. सकाळी सात ते दहा या तीन तासांत शहरातील अनेक भाग स्वच्छतेने उजळून निघाले. या महास्वच्छता अभियानामुळे नीरा शहराला केवळ स्वच्छतेचा नवा चेहराच मिळाला नाही, तर समाजसेवेचा प्रेरणादायी संदेशही मिळाला.

## पुरंदरमध्ये ७ मार्च रोजी 'महाराजस्व समाधान शिबिर'

नाझरे सुपे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या 'प्रशासन लोकांच्या दारी' या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी पुरंदर तालुक्यात 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत विशेष समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार, ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता मौजे वाघापूर येथील श्री भैरवनाथ मंदिर येथे संपन्न होणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय पुरंदर व तहसील कार्यालय पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरामुळे कुंभारवळण आणि राजेवाडी महसूल मंडळातील

"कुंभारवळण आणि राजेवाडी परिसरातील सर्व शेतकरी बांधव, भगिनी आणि तरुणांनी या संधीचा लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रशासकीय कामे पूर्ण करून घ्यावीत. प्रशासनाचे अधिकारी स्वतः तुमच्या दारी येत असून, या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा," असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकरी व ग्रामस्थांना आपल्या विविध कामांसाठी सरकारी कचेऱ्यांचे उंबरठे झिजवण्यापासून मोठा दिलासा मिळणार आहे.

एकाच छताखाली मिळणार 'या' महत्त्वपूर्ण सेवा: या शिबिरामध्ये विविध विभागांचे स्टॉल्स लावले जाणार असून, खालील सेवांचा लाभ नागरिकांना घेता येईल प्रलंबित फेरफार नोंदी, सातबारा उताऱ्यामधील नावांच्या चुकांची दुरुस्ती, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा आणि ८-अ उताऱ्यांचे थेट वाटप. तसेच तुकडे बंदी नियमितीकरण आणि वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला गती दिली जाईल.

दाखले व प्रमाणपत्रे: लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत आवश्यक असणारे जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर, उत्पन्न दाखला, रहिवास व अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्रांचे संकलन व वाटप केले जाईल.

सामाजिक सुरक्षा योजना: संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी पेन्शन योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज निकाली काढले जातील.

डिजिटल नोंदणी (एक खिडकी योजना): शेतीशी संबंधित अत्यंत महत्त्वाची ॲग्रिस्टॅग नोंदणी, पीएम किसान नवीन नोंदणी आणि प्रलंबित ई-केवायसी ची कामे या शिबिरात पूर्ण केली जातील.

भूसंपादन आणि अकृषिक जमिनींच्या संदर्भातील 'कमी-जास्त पत्रक' तयार करणे, तसेच अकृषिक तरतुदींनुसार सुधारित अधिमूल्य वसूल करून प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यामुळे परिसरातील शेतकरी वर्गाचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होणार आहे.

## महात्मा गांधी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात संपन्न

राजगुरुनगर (दै. संध्या)

खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचालित महात्मा गांधी विद्यालय मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी पुणे जिल्हा विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष व राष्ट्रीय विद्यालय कुरकुंडी चे मुख्याध्यापक रोहिदास एकाड, पुणे जिल्हा विज्ञान अध्यापक संघाचे उपाध्यक्ष देवराव दादा कांबळे, विद्यालयाच्या प्राचार्या संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका अस्मिता पाठक, पर्यवेक्षिका रेखा जाधव, सुनीता ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिकात्मक होळीचे पूजन व रोपाला जलप्रदान करून झाली. आनंददायी शनिवार उपक्रम अंतर्गत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरण पूरक होळीच्या रंगांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले होते.

यावेळी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम विज्ञानवाहिनी प्रयोगशाळा उपक्रमांतर्गत श्री. कांबळे यांनी विद्यार्थ्यांसमोर दाब,जडत्व,बल व गुरुत्वाकर्षण अशा काही निवडक वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित असलेले विविध प्रयोग विद्यार्थ्यांसमोर सादर केले. प्रयोगात जोशपूर्ण गाण्यांची जोड असल्यामुळे कार्यक्रम अतिशय मनोरंजनात्मक व आकर्षक ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रेया मांजरे व रिद्धी कदम या विद्यार्थिनींनी केले होते.

## अनाथ, निराधार लेकरांना मी मायेची सावली देईन : रूपाली राक्षे

चाकण (दै. संध्या)



भाकरीचा चंद्र शोधणाऱ्या अनाथ व पितृछत्र हरपलेल्या निराधार लेकरांना मी माझ्या यशोदा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून मायेची सावली देईन, असा निर्धार सामाजिक कार्यकर्त्या रूपाली राक्षे यांनी केला. जरेवाडी येथे अनाथांसाठी यशोदा या सामाजिक संस्थेचा खेडचे आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी रूपाली राक्षे बोलत होत्या. याप्रसंगी आ. बाबाजी काळे, पोलीस पाटील रुपाली रोडे, अर्चना किर्लोस्कर, वैशाली जरे, वैशाली कांबळे, सुरेखा रावळ, सुशिला मोरे, ॲड. सुलभा कोटबागी, सरपंच अशोक जरे, उपसरपंच मयूर जगदाळे, अंकुश जरे, संतोष ढोरे, कैलास दुधाळे, अनिल राक्षे, नितीन सैद आदी उपस्थित होते. रूपाली राक्षे पुढे म्हणाल्या," महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गरिबांना जपले आणि आणि वाढवले. या थोर पुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मी आणि माझी यशोदा सामाजिक संस्था अनाथ लेकरांसाठी सावली बनून चिरंतन काळ समाजात काम करणार आहे." जिल्हा परिषदेच्या सदस्या दिप्ती भोगाडे व आ. बाबाजी काळे यांनी रुपाली राक्षे यांच्या कार्याचा गौरव केला. प्रचंड मेहनत घेऊन अनाथ, वृद्ध व गरिबांसाठी यशोदा या सामाजिक संस्थेची स्थापन केली. रूपाली राक्षे यांचा आदर्श आजच्या पिढीला चालना व प्रेरणा देणारा एक चालता बोलता इतिहास आहे."

## अरण्येश्वर येथे मराठी भाषा दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

### 'भारतीय शिक्षण प्रणाली व आधुनिक शिक्षण' पुस्तकाचे प्रकाशन

पुणे (दै. संध्या)



अरण्येश्वर येथील अध्यापक महाविद्यालयात २८ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यापूर्वी २३ ते २७ फेब्रुवारी दरम्यान मराठी संवर्धन आठवडा देखील महाविद्यालयात उत्साहात साजरा झाला.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब चौगुले, एम.बी.ए. कॉलेजच्या संचालिका डॉ. प्राजक्ता वराळे तसेच डी.एड. कॉलेजचे प्राचार्य संतोष शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका सौ. मानिनी कोलते यांनी सादर केले. मराठी भाषा दिनाचे आयोजन प्राध्यापिका सौ. शैला रासकर व महाविद्यालयाच्य सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शुभांगी कुऱ्हाडे यांनी केले, तर राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन प्राध्यापिका डॉ. शुभांगी गोडसे यांनी केले.

विज्ञान दिनानिमित्त विविध वैज्ञानिक प्रयोगांचे प्रात्यक्षिक, विज्ञान प्रश्नोत्तर स्पर्धा (मंजुषा) तसेच विज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करणारे उपक्रम राबविण्यात आले. मराठी भाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी गणेशवंदना, पोवाडा, मराठी अभिमान गीत, भारूड, अभंग, लोकनृत्य, बासरी वादन, समूहगीत, कोळीगीत, मंगळागौर, युगत मांडळी तसेच गोंधळी गीत अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

याच कार्यक्रमात प्रा. डॉ. शुभांगी कुऱ्हाडे व प्रा. डॉ. प्राजक्ता खटाटे लिखित आणि बी.एड. अभ्यासक्रमावर आधारित 'भारतीय शिक्षण प्रणाली व आधुनिक शिक्षण' या मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांतील पुस्तकांचे प्रकाशन प्राचार्य डॉ. बापूसाहेब चौगुले, डॉ. प्राजक्ता वराळे व प्राचार्य संतोष शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. सदर पुस्तके बी.एड. विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रियांका जायभाये यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाचा समारोप ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानाने करण्यात आला. एकूणच मराठी भाषा व विज्ञान यांचा सुंदर संगम साधत हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### *तोंडल ता. खंडाळा मध्ये कुलदैवत श्री ज्योतिर्लिंग मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा व श्री महादेव मंदिर*

# कलशारोहण सोहळा जल्लोषात व भक्तिमय वातावरणात संपन्न

सातारा (दै. संध्या)



सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील तोंडल गावासाठी अत्यंत ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्वाचा ठरणारा कुलदैवत श्री ज्योतिर्लिंग मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व श्री महादेव मंदिर कलशारोहण समारंभ बुधवार दि. १८ फेब्रुवारी ते शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला . संपूर्ण गाव, पंचक्रोशीतील भाविक तसेच माहेरवाशीण यांच्यासाठी हा सोहळा श्रद्धा, परंपरा आणि संस्कृतीचा उत्सव ठरला .माघ शुद्ध पंचमी (शके १९४७), शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ या शुभ मुहूर्तावर संपन्न झालेल्या या प्राणप्रतिष्ठा व कळशारोहन सोहळ्यामुळे तोंडल गाव धार्मिक उर्जेने भारून गेल्याचे पाहायला मिळाले.श्रींच्या नूतन मूर्तीची वाडी रत्नागिरी येथे मूळ क्षेत्र भेट व ग्रामप्रदक्षिणेने बुधवार दि. १८ फेब्रुवारी रोजी सोहळ्याची सुरुवात श्री क्षेत्र ज्योतिबा डोंगर येथे मूर्तीच्या पूजनाने झाली . येथे श्री ज्योतिबा, श्री चोपडाई माता, श्री केदारनाथ व श्री काळभैरवनाथ देवतांना अभिषेक, वस्त्रदान व मानपान करण्यात आला. त्यानंतर मूर्ती तोंडलकडे प्रस्थान झाले.मार्गात भादवडे येथील श्री तुकाई माता मंदिराला भेट देण्यात आली .सोबतच युवकांनी जोतिर्लिंग मंदिर, वाडी रत्नागिरी येथून मूळ मंदिरातून पवित्र ज्योत पेटवून ती पायी तोंडलकडे आणली.सायंकाळी ५ वाजता तोंडल गावात मूर्तीची भव्य ग्रामप्रदक्षिणा व मिरवणूक काढण्यातआली.मिरवणूकीमध्ये अघोर महाकाल पथकाने मनमोहक नृत्य सादर केले. ज्यामुळे संपूर्ण गाव भक्तिरंगात न्हाऊन निघाले .हलगी, ढोल ताश्यांच्या कडकडाटात सजावलेल्या रथातून मूर्तीची ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली. रात्री आरतीनंतर धान्याधिवास व शय्याधिवास विधी पार पडला. वैदिक विधी, होमहवन आणि धार्मिक संस्कारांचा महासोहळा

गुरुवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळपासून विविध वैदिक कार्यक्रम पार पडले .ग्रामदेवतांचे अभिषेक, शांतीपाठ, गणपती पूजन, मंडपपूजन, मातृकापूजन आणि होमहवन यांसह धार्मिक विधी पार पडले .सायंकाळी मूर्तीला जलाधीस्नान , पंचामृत स्नान आणि औषधी स्नान करण्यात आल्यानंतर रात्री जि.प. प्राथमिक शाळा, तोंडल येथे " अविष्कार कलागुणांचा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .चिमुकल्यानी सादर केलेल्या नृत्य व विनोदी चुटकुल्यांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली.शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी शांतीपाठ व मुख्य होम पूर्ण झाल्यानंतर दुपारी १२.५९ वाजता श्री ज्योतिर्लिंग मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना विधी संपन्न झाली. यानंतर महाआरती होऊन दुपारी १.३० वाजता ह.भ.प. श्री दिलीप महाराज देशमुख यांच्या शुभहस्ते श्री महादेव मंदिराचे कलशारोहण करण्यात आले दुपारी ज्योतिबा देवाचा गोंधळ (डवरपूजन), माहेरवाशीण मानपान कार्यक्रम आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी गावातील सर्व पिढ्यातील माहेरवाशिनी उपस्थित होत्या. त्याचबरोबर गावातील इतरत्र बाहेर गावी स्थायिक झालेले ग्रामस्थ, मूळ तोंडलकर सहपरिवार उपस्थित होते.सायंकाळी व रात्री धार्मिक वातावरण अधिक रंगतदार करण्यासाठी कीर्तन सेवा ह.भ.प. श्री संतोषजी महाराज माने, दाटेगावकर हिंगोली यांनी सादर केली. त्यानंतर हरिजागर कार्यक्रम श्री दत्त भजनी मंडळ भादे, ग्रामस्थ भजनी मंडळ शेडगेवाडी,श्री ज्योतिर्लिंग प्रासादिक भजनी मंडळ व महिला भजनी मंडळ यांनी संपन्न केला. पुजारी व आयोजन समिती या सोहळ्याचे धार्मिक विधी आचार्य श्री रविंद्र अनघळ गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले असून सहकार्य म्हणून श्री स्वप्निल कुलकर्णी (काका), श्री गणेश ठाकरे (पुजारी) आणि श्री राजेंद्र (बापू) दळवी (पुजारी) यांनी सेवा बजावली.

या सोहळ्यासाठी सर्व तोंडलकर, माहेरवाशिनी व परिसरातील भाविक, मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. श्रद्धा, परंपरा आणि एकात्मतेचा संगम ठरणारा तोंडलचा हा सोहळा संपूर्ण परिसरासाठी आध्यात्मिक पर्वणी ठरला. ग्रामस्थ मंडळ तोंडल, गणेश तरुण मंडळ, ॐ गणेश तरुण मंडळ यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.